# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २९ जुलै, २०१५ / श्रावण ७, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११४**

---

**मुंबई शहरातील विविध भागातील बी.डी.डी चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(१) * ७७९१ श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयंत पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील विविध भागातील बी.डी.डी चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्याकरिता गृहनिर्माण विभागातर्फे आराखडा तयार करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास कोणामार्फत करण्यात येणार आहे, तसेच या योजनेंतर्गत किती चौरस फुटाच्या सदनिका देण्यात येणार आहेत,

(३) तसेच, बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) मुंबई शहरातील कामगार वर्गासाठी वरळी, ना.म.जोशी मार्ग, नायगाव व शिवडी या ठिकाणी सन १९२१ ते १९२५ या कालावधीत बांधण्यात आलेल्या २०७ मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळीचा पुनर्विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३ (९) मधील तरतूदीनुसार करण्यांत येणार आहे. त्याअनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ**

**(२) * ७८४६ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सरकारी व निमसरकारी कार्यालयात विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर मागील काही महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धाडी टाकून अनधिकृत मालमत्ता जप्त केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनधिकृत व गैरमार्गाने मिळविलेल्या मालमत्तेबाबत शासनाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच लाचलुचपत प्रकरणी शासन त्वरीत निर्णय घेत नसल्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढून दिवसेंदिवस गुन्ह्यात मोठया प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकारांना आळा घालणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्‌याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्‌वारे दि. ०१.०१.२०१५ ते दि. ०७.०७.२०१५ या कालावधीत एकूण ६३६ लाचेच्या सापळा प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये एकूण ८२० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभागाद्‌वारे सन २०१५ मध्ये अपसंपदेचे एकूण २१ गुन्हे दाखल आले आहेत.

(२) आरोपी लोकसेवक यांच्या अनधिकृत मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी करण्यात येऊन चौकशीत अपसंपदा निष्पन्न झाल्यास संबंधित आरोपी लोकसेवकांविरुध्द अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात येतो. मा.न्यायालयाच्या आदेशाने आरोपी लोकसेवक यांची अपसंपदा शासनाकडून जप्त केली जाते.

(३) शासकीय लोकसेवकांविरुध्द भ्रष्टाचारासंदर्भात तक्रार करण्यास विविध पर्याय उपलब्ध झाल्याने जानेवारी ते जुलै-२०१४ च्या तुलनेत जानेवारी ते जुलै-२०१५ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणांमध्ये ६ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

(४) व (५) भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना भ्रष्टाचारासंदर्भात तक्रारी नोंदविण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत www.acbmaharashtra.gov.in संकेतस्थळ, www.acbmaharashtra.net हे मोबाईल ॲप व www.facebook.com/maharashtraACB या फेसबुक पेजवर तक्रार करण्याची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली असून भ्रष्टाचारासंदर्भात तक्रारी नोंदविण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत टोल फ्री क्र. १०६४ सुरु करण्यात आला आहे.

तसेच जनतेच्या संपर्कात येणाऱ्या कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत तसेच सरकारी कामकाजाकरीता कागदपत्रे/दस्ताऐवज स्विकारणे व देणे हे डिजीटल पध्दतीने करण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सर्व कार्यालयांना करण्यात आले असून सरकारी कामाकरीता लागणारे शासकीय शुल्क रोख स्वरुपात न घेता बँकेकडून ऑनलाईन पध्दतीने भरुन घेण्यास सुचविण्यात आले आहे.

-----------------

**मुंबईतील माझगांव ताडवाडी येथील बीआयटी चाळ क्र.१ ते ११ या इमारती धोकादायक असल्याचे महानगरपालिकेने घोषित केल्याबाबत**

**(३) * ७७८१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव ताडवाडी येथील बीआयटी चाळ क्र.१ ते ११ या इमारती धोकादायक म्हणून घोषित केल्याने त्याठिकाणी राहणाऱ्या ७५० कुटुंबांना महापालिकेने नोटीसा बजाविल्या असल्याने ऐन पावसाळ्यात या कुटुंबांना बेघर होण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कुटुंबांच्या निवासाबाबत शासन व महापालिकेने कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे,
(३) अद्याप, पर्यायी निवास व्यवस्था केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या कोल्हापूर येथील स्मृतीस्थळाच्या प्रलंबित कामाबाबत

**(४) * ६९१७ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.राजेंद्र जैन, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक क्रांतीचे उदगाते राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या कोल्हापूर येथील स्मृतीस्थळाचा आराखडा तयार असून भूमीपूजनाचा समारंभ १६ महिन्यापूर्वी होवून देखील स्मृतीस्थळाचे काम अद्यापही सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत तसेच या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त स्मृतीस्थळाचे काम विहित कालावधीत पूर्ण करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अदयाप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सामाजिक क्रांतीचे उदगाते राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीस्थळाचा भूमीपूजन समारंभ दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेला आहे.

(२) सदर कामाची निविदा महानगरपालिकेने दिनांक ११/६/२०१५ रोजी प्रसिद्ध केली असून निविदा प्रक्रिया अंतिम करून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.
(३) प्रश्नाधिन प्रस्तावास स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिका क्षेत्रात भामा आस्केड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलवाहिनी टाकण्याच्या कामात एल ॲण्ड टी कंपनीने कराराचे केलेले उल्लंघन**

**(५) * ८१७३ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका क्षेत्रात भामा आस्केड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलवाहिनी टाकण्याचे काम करणाऱ्या एल ॲण्ड टी कंपनीने महानगरपालिकेबरोबर केलेल्या अटीचे पालन केले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेबरोबरच्या करारानूसार काम करणे संबंधीत कंपनीवर बंधनकारक असताना पाईपच्या अंतर्गत लायनिंगचे काम करता साईटवर लायनिंगचे काम करण्याची परवानगी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कराराचे उल्लघंन केल्याबद्दल महानगरपालिकेने एल ॲण्ड टी कंपनीविरुध्द कारवाई न केल्यामुळे शासनाने सदरहू प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) सदर कामाबाबत निविदेतील अटी व शर्तीनुसार साईटवर फॅक्टरी उभारुन पाईप लायनिंगचे काम करणेत येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील बड्या उद्योग आस्थापनांना दिलेल्या २३४ जागांची भाडेतत्वाची मुदत संपुष्टात आल्याबाबत**

**(६) * ७२०६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालक्ष्मी येथील रेसकोर्सची जागा महापालिकेने रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबला भाडे करारावर दिलेली असून सदरील भाडे करार दिनांक ३१ मे, २०१३ रोजी संपुष्टात आला असूनही रॉयल वेस्टर्नकडून अनाधितकृतपणे जागेचा वापर होत असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जागेत अजूनही घोडयांची स्पर्धा, विवाहांबरोबरच अनेक समारंभ तसेच उपहारगृह चालविण्यासाठी गॅलॉप्सला दिलेली जागा या सर्व कारणांमुळे क्लबविरोधात कारवाई करण्याची मागणी महापालिका आयुक्त यांच्याकडे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मुंबईतील ताज बिल्डिंग, टाटा सन्स प्रा.लि., दि इंडियन हॉटेल लि. आदी बड्या उद्योग आस्थापनांना दिलेल्या २३४ जागांची भाडे तत्वाची मुदत संपुष्टात येऊन सुमारे ४ ते १५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी उलटून गेला असूनही मुंबई महानगरपालिकेने या मालमत्तांबाबत कोणतेही धोरण तयार केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न बाब १ व ३ प्रकरणी चौकशी करुन उपरोक्त बाबींकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कारवाई करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकूण ४,१७७ भूभाग मक्त्याने दिलेले असून त्यापैकी २३४ भूभागांचा मक्ता कालावधी संपुष्टात आलेला आहे.

मक्ता संपुष्टात आलेल्या २३४ मालमत्तांपैकी १२० मालमत्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या असून, ११४ मालमत्ता राज्य शासनाच्या मालकीच्या आहेत.

महानगरपालिकेच्या मालमत्तांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने धोरण तयार केले आहे.

राज्य शासनाच्या मालमत्तांच्या मक्ता नुतनीकरणाचे धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तळोजा येथे उभारण्यात येणाऱ्या घनकचरा विल्हेवाट प्रकल्पाचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(७) * ६९८४ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २७२३ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील सहा पालिकांसाठी वरदान ठरणाऱ्या तळोजा येथे २ हजार कोटी रुपये खर्च करुन उभारण्यात येणाऱ्या घनकचरा विल्हेवाट प्रकल्पाचे काम अद्यापही पूर्ण झाले नसल्याचे दिनांक ७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याच त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजीच्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होवू शकले नाही.

(२) व (३) तळोजा प्रकल्पात सहभागी होण्यास व त्यासाठी आवश्यक असलेली टिपींग फी भरण्याची तयारी असल्याबाबतचा महासभेच्या ठरावासह स्थानिक स्वराज्य संस्थांची सहमती आवश्यक आहे. सदर सामाईक भरावभूमी प्रकल्पाची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेसर्स इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन (कर्नाटका) लिमिटेड ह्या सल्लागाराची प्राथमिक अहवाल तयार करण्यासाठी नेमणूक दि. ४ मार्च, २०१५ रोजी केली आहे. सल्लागाराने प्रकल्प उभारणीच्या महत्वाच्या बाबी अभ्यासातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास अहवाल सादर केलेला आहे.

## मुंबईतील मालाड, मालवणी परिसरात झोपड्यांचे होत असलेले अनधिकृत बांधकाम

**(८) * ७३७२ श्री.विजय गिरकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड, मालवणी येथील साबरीया मशिदीसमोर रातोडी, खारोडी, धारोली गावात सरकारी जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत झोपड्या बांधत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील काही भु-माफीया यांचे पालिका अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांचेशी संगनमताने असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत झोपडया बांधण्याचे प्रकार सरकारी जागा बळकविण्याचे काम असल्याचे निदर्शनास येऊन स्थानिक प्रशासन व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत झोपडया बांधण्याऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२), (३) व (४) मौजे मालवणी महसूली गावांतर्गत राठोडी व खारोडी या लोकवस्त्या असून त्यांच्यापासून दक्षिणेस ५०० मीटर अंतरावर खाजगी जमिनीवर साबरिया मशिद आहे. सदर मशिदीपासून २०० मीटर अंतरावर न.भू.क्र. २६७० ही शासनाची जमीन आहे. सदर मिळकतीवरील अतिक्रमीत ४७ झोपडयांचे उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड यांचेमार्फत दि. १७.३.२०१५ रोजी निष्कासन करण्यात आले आहे.

न.भू.क्र.२६७० या शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामांबाबत वारंवार निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच अतिक्रमणांस आळा घालण्याकरिता आणि सदर मिळकतीचे (शासकीय जमीन) संरक्षण करण्याच्या दृष्टीने सदर जागेभोवती पक्की संरक्षण भिंत बांधण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने सन २०१४-१५ मध्ये रु.३३.६९ लाख इतकी तरतूद केली आहे व त्यानुसार संरक्षण भिंत बांधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मेट्रो सिझनसाठी तयार केलेल्या प्रारुप आराखड्यामध्ये त्रुटी असल्याबाबत

**(९) * ८२७४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपराजधानी नागपूर येथील २५ किमी परिसरातील मेट्रो सिझनसाठी तयार केलेला प्रारुप आराखड्यात अनेक त्रुटी असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मेट्रो आराखडयास शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा आराखडा फक्त शहरातील बडे विकासक व व्यावसायिकांकरिता असून कुणालाही विश्वासात न घेता तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) सामान्यांचे व गरीब शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता मेट्रो आराखडा रद्द करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नागपूर महानगर प्रदेश विकास क्षेत्रासाठीची प्रारुप विकास योजना नागपूर सुधार प्रन्यासने जनतेच्या हरकती/सूचनांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द केली आहे.

प्रारुप विकास आराखडयात शासनाच्या सन १९७९ च्या नियोजन मानकानुसार सार्वजनिक हिताच्या दृष्टिने आवश्यक सोयी-सुविधांकरीता आरक्षणे प्रस्तावित केली असून, मुख्यत्वे अशा आरक्षणाने बाधीत होत असलेल्या जमीन मालकांनी आरक्षणाबाबत आक्षेप सादर केलेले आहेत.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधिल तरतुदीनुसारच नागपूर महानगर क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यास महाराष्ट्र महानगर नियोजन समिती, (रचना व कामे) (तरतूदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९६६ चे कलम ३ अन्वये गठीत नागपूर महानगर नियोजन समितीपुढे दि. ३१/१/२०१५ रोजी सादरीकरण करण्यात आले व सदर बैठकीत समितीने प्रसिध्दीस मंजुरी प्रदान केली आहे. त्याप्रमाणे प्रारुप विकास आराखडा दि. २०/०२/२०१५ रोजी सूचना/आक्षेप नोंदविण्याकरीता प्रसिध्द करण्यात आला.

(४) सदर विकास आराखडयासंदर्भात प्राप्त हरकती/सूचना विचारात घेऊन सदर आराखडा नागपूर सुधार प्रन्यास अंतिम मंजूरीसाठी शासनाकडे सादर करणार आहे. त्यामुळे यानुषंगाने सद्य:स्थितीत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मुंबई-पुणे तसेच, भूकंपप्रवण क्षेत्रातातील उंच इमारतीच्या बांधकामांना परवानगी न देण्याबाबत**

**(१०) * ७०५७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, पुणे व अन्य काही शहरांना भूकंपाचा धोका असून मुंबई शहर हे भूकंप प्रवण क्षेत्रात मोडत असल्याने २० मजल्यापेक्षा जास्त उंचीच्या इमारतीच्या बांधकामांना परवानगी देवू नये असा सल्ला या क्षेत्रातील तज्ञ आणि आय.आय.टी. मुंबईचे माजी प्राध्यापक व्ही.सुब्रमण्यम यांनी शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुण्यासह राज्यातील भूकंपप्रवण क्षेत्रात नव्या बांधकामाला तातडीने भूकंपरोधक यंत्रणा बसविण्याची सक्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) महाराष्ट्र आपत्ती जोखीम व्यवस्थापनांतर्गत विभागीय व जिल्हा स्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्राधिकरणाच्या आतापर्यंत किती बैठका घेण्यात आल्या व त्यात कोणते निर्णय घेण्यात आले,

(५) असल्यास, याबाबत शासनाने आढावा घेतला आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील कोणत्या शहरांना साधारणतः कोणत्या कारणामुळे भूकंपाचा धोका असल्याचे त्यात आढळून आले आहे,

(७) या संदर्भात कोणत्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे व त्यादृष्टीने कोणती कार्यवाही कोणत्या स्तरावर सुरू आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई विद्यापीठामध्ये जानेवारी, २०१५ मध्ये भरलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या १०२ व्या अधिवेशनामध्ये मुंबई आय.आय.टी.चे निवृत्त शास्त्रज्ञ श्री.व्ही.सुब्रमण्यम यांनी मुंबई शहराला भूकंपाचा धोका असल्याचे मत व्यक्त केले. यात त्यांनी ६.२ ते ६.५ रिश्टर स्केल इतक्या तीव्रतेच्या भूकंपाची शक्यता व्यक्त केली असून त्यामुळे उंच इमारतींना धोका असल्याचे मत व्यक्त केले आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.१११५०/२०१३ मध्ये दिनांक १७/१२/२०१३ रोजी आदेश देवून मुंबईतील उंच इमारतीच्या प्रस्तावाची छाननी करणेसाठी श्री.पी.एस.पाटणकर, निवृत्त न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत केलेली आहे. सदर समिती दिनांक ९/६/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यरत झालेली आहे. त्यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, आय.आय.टी., मुंबई येथील प्राध्यापक तसेच व्हिजेटीआय, मुंबई येथील संरचनात्मक अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक, निरी या संस्थेचे शास्त्रज्ञ, श्री.पंकज जोशी, वास्तुविशारद या तज्ञ व्यक्तींचा समावेश आहे. सदर समितीकडून प्रामुख्याने ७० मी.पेक्षा जास्त उंच असलेल्या इमारतींच्या प्रस्तावाची छाननी करणेत येत आहे. श्री.व्ही.सुब्रमण्यम यांनी व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने सदर समितीचे अभिप्राय घेवून शासनास सत्वर सादर करण्याच्या सूचना आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक २९ जून, २०१५ च्या पत्रान्वये देणेत आलेल्या आहेत.

सदर समितीचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील उंच इमारतींच्या बांधकाम प्रस्तावाच्या छाननीसाठी सध्याच्या व्यवस्थेचे पुनर्विलोकन करुन शिफारशी करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त असलेल्या तांत्रिक अभ्यासगटासमोर सदर बाब पडताळणेत येवून त्यानुसार मुंबई शहरासंदर्भातील होणाऱ्या निर्णयास अनुसरुन इतर ठिकाणी त्याप्रमाणे कार्यवाही करणेचे संकल्पित आहे.

(३) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तसेच प्रत्येक जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

(४) व (५) राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची दरवर्षी मान्सूनपूर्व आढावा बैठक घेणेत येते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठका नियमितपणे आवश्यकतेनुसार घेण्यात येतात. राज्य आणि जिल्हा प्राधिकरणाच्या बैठकीत आपत्तीविषयक सर्व आवश्यक बाबी हाताळण्यात येतात. आपत्तीबाबतची पूर्वतयारी आणि सौम्यिकरण याबाबतही निर्णय घेण्यात येतो. जिल्हा प्राधिकरणाकडून राज्य शासनाकडे या बैठकांचे इतिवृत्त माहितीसाठी तसेच आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येते.

(६) व (७) प्रस्तुत प्रकरणी प्रश्न क्र.१ व २ च्या उत्तरामध्ये नमूद केलेप्रमाणे शासनाकडून कार्यवाही संकल्पित आहे.

-----------------

## हडपसर-हवेली (जि.पुणे) स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याबाबत

**(११) * ६७५० डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर-हवेली (जि.पुणे) स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात राज्य सरकारने पुणे महापालिकेकडे अभिप्राय मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने आपला अभिप्राय राज्य शासनास सादर केला आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, संभाव्य महापालिकेत कोणकोणत्या गावांचा समावेश होणार आहे,

(५) असल्यास, यासंदर्भात केव्हापर्यंत निर्णय होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हडपसर-हवेली स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचेकडून अहवाल अप्राप्त असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाचा कारभार अपुऱ्या जागेत सुरु असल्याबाबत

**(१२) * ७९१७ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाचा कारभार अपुऱ्या जागेत सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयास पुरेशी जागा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर कार्यालयाचा कारभार अपुऱ्या जागेत चालू असल्याचे चौकशीत आढळले, सदर कार्यालयास सोलापूर शहरातील सिटी सर्वे नं. ६३/१ अ पैकी ६/२२, अंदाजे ३००० चौ.मी जागा जिल्हाधिकारी कार्यालये, सोलापूर यांचेमार्फत देण्यात आली आहे. या जागेवर सदर कार्यालयाकरिता नविन इमारत बांधण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) यानुषंगाने कार्यवाही सुरु असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक पंचवटी येथील हॉटेलला स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेली अचानक भेट**

**(१३) * ७७४१ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पंचवटी येथील एका महाविद्यालयासमोर असलेल्या हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय चालत असतो असा संशय व्यक्त करुन एका स्थानिक लोकप्रतिनिधींनी अचानक दिलेल्या भेटीमध्ये पती-पत्नीला त्रास दिल्याची घटना दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर हॉटेलवर छापा टाकून हॉटेल व्यवस्थापकास, मालकास तसेच वास्तव्यास असलेल्या पती-पत्नीला त्रास देणाऱ्या लोकप्रतिनिधींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) चौकशीत सदर जोडपे हे पतीपत्नी असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर जोडप्याने अथवा इतर कोणीही तक्रार केलेली नसल्याने संबंधित लोकप्रतिनिधींवर कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर हॉटेलमध्ये कोणताही अनुचित प्रकार अथवा लोकप्रतिनिधींच्या म्हणण्यानुसार वेश्या व्यवसाय आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमवाडी, येरवडा, औंध (जि.पुणे) येथे नदीपात्रा लगत राडारोडा टाकणाऱ्यांवर करावयाची कारवाई

**(१४) * ७९५६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील संगमवाडी, येरवडा, औंध येथील नदीपात्रात दररोज हजारो ट्रक राडारोड टाकला जात असल्याने नदीला मरणासन्न बनविण्याचे प्रयत्न सुरु असल्याने याबाबत काही स्वयंसेवी संस्थांनी व जनतेनी शासनाकडे तसेच महापालिकेतील अधिकाऱ्यांचे गेल्या दोन वर्षापासून लक्षवेधूनही कोणतीच कारवाई केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीमध्ये रोज राडारोडा टाकल्यामुळे नदीचे पाणी दुषित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राडारोडा टाकणाऱ्यांवर प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कारवाई न करण्याची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे येथील संगमवाडी, येरवडा , औध या सारख्या ठिकाणी नदीपात्रालगत राडारोडा टाकला जात असून, त्यासंदर्भात लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त होत असतात, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, त्यानुषंगाने कारवाई केली जात नाही ही बाब खरी नाही.

(२) नदीपात्रात राडारोडा पडल्यामुळे नदीचे पाणी दुषित होते अशी वस्तुस्थिती नाही.

(३) नदीपात्रालगत राडारोडा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असून, मागील ३ महिन्यात रुपये ८५,०००/- दंड वसूल करण्यात आला आहे.

नदीपात्रालगत राडारोडा टाकण्यात आलेल्या तीन मिळकतीच्या पाच मिळकतधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अन्वये नोटीस देण्यात आली आहे.

राडारोडा याबाबत प्रत्यक्ष जागा पाहणी करुन अज्ञात इसमाविरुध्द चतु:श्रुंगी पोलिस स्टेशन, पुणे येथे दिनांक २५.५.२०१५ रोजी एफ.आय.आर. दाखल केला आहे.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील राडारोडा टाकण्यासाठी मौ.वाघोली येथील दगडखाणीची जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील नागरिकांच्या समस्यांबाबत

**(१५) * ७०१३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेची हद्दवाढ होऊन २३ वर्षांचा कालावधी उलटून गेला असला तरी हद्दवाढ भागात रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, पाण्याचा निचरा करणारी यंत्रणा इ. समस्या असून येथील नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत असल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील हद्दवाढ भागात नागरिकांना शहराप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) याबाबत सोलापूर महानगरपालिकेने त्यांचे अर्थसंकल्पात तरतूद केली असून राज्य शासनाकडील विशेष अनुदान आणि शासनाच्या विविध योजनेतून हद्दवाढ झालेल्या भागात रस्ते, ड्रेनेज, पाईप लाईन यासंदर्भात कामे पूर्ण केली आहेत व इतर काही कामे प्रगतीपथावर आहेत.

सांडपाणी व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांनातर्गत सोलापूर शहर मलनिस्सारण व्यवस्थेत सुधार करणे हि योजना मंजूर असून सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये सदर योजनेंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे, मलप्रक्रिया केंद्र (S.T.P.) बांधणे इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील गोदावरी नदीकाठी झालेले अतिक्रमण व जलप्रदुषण दूर करण्याबाबत

**(१६) * ८०९८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८७४ ला दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभुमीवर नाशिक येथील गोदावरी नदीचे जल प्रदुषण थांबविणेबाबत शासनाकडून विविध तातडीच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार त्र्यंबक नगर परिषदेमार्फत अतिक्रमण काढणे व नदीपात्रातील प्रदुषण रोखणेसंदर्भात तर नाशिक महानगरपालिकेतर्फे निर्माल्य संकलनाबरोबर (NEERI) या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली विविध दिर्घ मुदतीच्या व तातडीच्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाब १ व २ मधील तातडीच्या उपाययोजना सुरु करुनही गोदावरी जल प्रदुषणाची सद्यस्थिती जैसे-थे असल्याच्या साधु-महंत व पर्यावरण प्रेमी नाशिककरांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंहस्थाचा कालावधी जवळ आल्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीकाठावरील अतिक्रमणे काढणे व प्रदुषण रोखणेसाठी धडककृती कार्यक्रम हाती घेण्याची गरज शासनाचे निदर्शनास आली आहे काय,
(५) असल्यास, गटारीचे सांडपाणी नदीत येवू न देणे, नदीपात्रातील शेवाळे, निर्माल्य व पानवेलीचे पुर्ण उच्चाटन करणेसंदर्भात शासन कोणती विशेष कार्यवाही व उपाययोजना करीत आहे वा करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने, गोदावरी नदीचे जलप्रदुषण थांबविण्याकरीता विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.
(२) हरीत लवादाच्या आदेशानुसार त्र्यंबक शहरातील गोदावरी नदीपात्रात मिसळणारे सांडपाणी स्वतंत्र करण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. तसेच, त्र्यंबक शहरातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.

नाशिक महानगरपालिकेमार्फत गोदावरी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी खालील विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

- नाशिक महानगरपालिकेमार्फत रामघाट परिसर व नदीवरील पुलावर निर्माल्य संकलनासाठी कुंड ठेवण्यात आले आहेत.
- रामकुंड पुलाजवळ पिंडदान, पुजा साहित्य संकलीत करण्यासाठी कृत्रीम पात्र ठेवण्यात आले आहे.
- प्रायोगिक तत्वावर दोन पुलांच्या बाजूने गोदावरी पात्रात निर्माल्य टाकण्यास अटकाव करण्यासाठी जाळी बसविण्यात आली आहे.
- नाशिक शहरातील गोदावरी नदीला मिळणाऱ्या १९ नाल्यांमधील वाहणारे सांडपाणी अडवून मुख्य मलवाहिकेला जोडण्यात आले आहे.

- अस्तित्वातील मलवाहिकांची दुरुस्ती व देखभाल करण्यात येत आहे. तसेच गोदावरी नदीवर सुमारे ५.५ कि.मी. लांबीची नविन मलवाहिका टाकण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे.
- नदीपात्र स्वच्छ व प्रदुषण मुक्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या NEERI या संस्थेचे मार्गदर्शन विचारात घेऊन, स्वच्छतेबाबत नाशिक महानगरपालिका सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे.
- गोदावरी नदीपात्र दैनंदिन स्तरावर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रायोगिक तत्वावर बोटींचा वापर करुन ९ कि.मी. लांबीच्या पात्रासाठी ३ संस्थांची नियुक्ती करण्यात आली असून, गोदावरी नदीपात्रातील निर्माल्य, पानवेली यावर नियंत्रण करण्यात येत आहे.

सिंहस्थ कुंभमेळा हा हरित कुंभ म्हणुन साजरा करण्यात येत असून विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांमधील जनजागृती करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे.

(३) उपरोक्त भाग-२ मध्ये नमूद केल्यानुसार उपाययोजना करण्यात येत आहेत. तथापि, सद्यःस्थितीत नाशिक शहरामध्ये दाखल झालेले साधु महंत व भाविकांकडुन देखील स्वच्छतेच्या अनुषंगाने, सूचना प्राप्त होत असून, अशा सूचनांचे तातडीने निराकरण करण्यात येत आहे.

(४) व (५) सिंहस्थ कुंभमेळा गोदावरी नदी परिसरात होत असल्याची बाब विचारात घेऊन, गोदावरी नदी किना-याकडे येणा-या विविध मार्गावरील तसेच नरीकाठ परिसरातील अतिक्रमणे ही दिनांक ०५.०१.२०१५ दिनांक १५.०६.२०१५ आणि दिनांक ०६.०७.२०१५ रोजी हटविण्यात आली आहेत. तसेच गोदावरी नदी परिसरातून अतिक्रमण पथकामार्फत दररोज गस्त घालण्यात येऊन, अतिक्रमणावर वेळोवेळी तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.

गोदावरी नदीपात्रातील शेवाळे निर्माल्य व पानवेलीच उच्चाटन करण्यासंदर्भात भाग-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपाययोजना करण्यात येत असून, दैनंदिन स्वच्छता ठेवली जात आहे.

-----------------

**राज्यातील मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात मराठी चित्रपटाचे**
**१२४ शो दाखविण्याच्या आदेशाबाबत**

**(१७) * ६९०५ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात मराठी चित्रपटाचे १२४ शो दाखविले पाहिजे असे शासनाचे आदेश असताना मल्टिप्लेक्स चित्रपटगृहे मराठी चित्रपटाचे शो दाखविण्यास चालढकल करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी चित्रपट मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात दाखविण्यास बंधनकारक करण्यासाठी नवीन अध्यादेश काढण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा अध्यादेश शासनाने काढला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कापशी (ता.पातुर, जि.अकोला) येथील गावच्या यात्रेत पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीमार**

**(१८) * ६७०७ श्री.जयंत पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कापशी (ता.पातुर, जि.अकोला) येथील गावच्या यात्रेत २०० पोलिसांच्या जमावाने तेथील गर्भवती महिला व वृद्ध तसेच ग्रामस्थांना अमानुषपणे मारहाण केल्याची घटना माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुर्वीपासुन परंपरेनुसार यात्रेत खेळण्यात येणाऱ्या जुगार खेळावरती कारवाई करण्याचे कारण काय,
(३) असल्यास, पोलीसांनी यात्रेची परवानगी देत असताना यात्रेत जुगार खेळण्यास बंदीची नोटीस दिली होती काय,
(४) नसल्यास, ग्रामस्थ, गर्भवती महिला, वृद्ध यांना कोणतीही पुर्वकल्पना न देता त्यांच्यावरती अमानुषपणे लाठीमार करणाऱ्या व त्यांच्या घरातील किमती वस्तूची नासधूस करणाऱ्या पोलीसांवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे काय,
(५) उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) व (३) दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी किंवा त्यादरम्यान कापशी येथे कोणतीही यात्रा नव्हती. यात्रा नसल्यामुळे पोलिसांकडे यात्रेची परवानगी मागितली नव्हती. राज्यात जुगार खेळण्यावर बंदी आहे. त्यामुळे बंदीची नोटीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी अपर पोलीस अधिक्षक अकोला यांनी चौकशी केली असून सहाय्यक पोलीस अधिक्षक, उपविभाग अकोला यांच्याविरुद्धचा चौकशी अहवाल पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्यात आला आहे.

परिविक्षाधीन पोलीस उप अधिक्षक यांना कामाचा अनुभव नव्हता. त्यांच्याकडून सदर प्रकरण योग्यरितीने हाताळले गेले नाही. म्हणुन त्यांना नाराजीपत्र देण्यात आले आहे.

४ पोलीस निरीक्षकांविरुद्ध चौकशी करण्याचे निदेश उपविभागीय पोलीस अधिकारी, अकोट यांना देण्यात आले आहेत.

३ कर्मचाऱ्यांविरुद्ध चौकशी करण्याचे आदेश पोलीस निरीक्षक, अकोट शहर यांना देण्यात आले आहेत.

४ पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

वरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्धचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यांच्यावर उचित कारवाई करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्हयातील नगर परिषद अंतर्गत म्हाडा विभागाकडून एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी सुधार योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(१९) * ७३८४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील नगर परिषद अंतर्गत म्हाडा विभागाकडून जवारहरलाल नेहरू पुनरुत्थान अभियानांतर्गत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी सुधार योजनेसाठी १०४४ घरकुल मंजूर झाले असून त्यापैकी ५७२ घरकुलांसाठी पातूर नगरपालिकेला सात कोटी रुपयांचा निधीही देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना डावलून धनिकांना व पालिकेच्या हद्दीबाहेर राहणाऱ्यांना उक्त योजनेचा लाभ देण्यात आल्यामुळे सदर योजनेचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई करण्याबाबत व सदर योजना तात्काळ कार्यन्वित करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) पातूर नगर परिषदे अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत १०४४ घरकुलांच्या प्रस्तावास राज्यस्तरीय समन्वय समितीने सन २००७ मध्ये मान्यता दिली होती. तथापि, केंद्र शासनाने सदर प्रस्तावास मान्यता दिली नव्हती. तद्नंतर, पातूर नगर परिषदेच्या ५७२ घरकुलाच्या सुधारित प्रस्तावास केंद्र शासनाने सन २०११ मध्ये मान्यता दिली आहे. प्रस्तुत ५७२ घरकुलाच्या प्रकल्पासाठी पातूर नगर परिषदेला केंद्र व राज्य हिश्यापोटी रु.५.२१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) नाही. पातूर नगरपरिषदे अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत २ ठिकाणी प्रकल्प राबविण्यात येत आहे.

त्यापैकी एक योजना in-situ पध्दतीनुसार लाभार्थ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी ३३६ घरकुलांचे बांधकाम प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प लाभार्थी ज्या जागेवर कच्चा घरात होते त्याच जागेवर लाभार्थी in-situ पध्दतीने स्व:त बांधकाम करीत असल्यामुळे पालिकेच्या हद्दीबाहेर राहणाऱ्या लाभार्थ्यांना व योजनेच्या लाभ दिलेला नाही. त्यापैकी १३० घरकुलाचे काम बाकी आहे.

दुसरी योजना Re-location स्वरुपाची असून यामध्ये २३६ लाभार्थीकरिता घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराने खोदकाम सुरु केले असता, तहसिलदार,पातूर यांनी गौण खनिजाबाबत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने रु. ३,४९,८०० इतकी रक्कम भरण्याचे आदेश दिले. सदर रकमेचा भरणा केल्यानंतर उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांनी सदर योजनेचे काम सुरु करण्याचे आदेश दिले. तद्नंतर सदर योजनेचे कंत्राटदाराने काम सुरु केले. सर्व ५७२ लाभार्थी म्हाडाने मंजूर केलेल्या डीपीआर नुसार निवडलेले आहेत, असे मुख्य अधिकारी, पातूर यांनी कळविले आहे. ही संपुर्ण योजना व लाभार्थी निवडीबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दि.१७.४.२०१५ रोजी जनहित याचिका क्र.३०/२०१५ दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. ६ मे, २०१५ रोजी दिलेल्या स्थगन आदेशामुळे सध्या संपूर्ण प्रकल्पाचे काम बंद आहे.

-----------------

**कोलशेत (जि.ठाणे) येथील क्लेरियंट कंपनीने बेकायदेशीररित्या झाडांची कत्तल केल्याबाबत**

**(२०) * ६६७३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलशेत (जि.ठाणे) येथील क्लेरियंट कंपनीच्या आवारात टोलेजंग इमारती उभारण्यासाठी विकासकाने सुमारे पाच हजार वृक्षांची बेसुमार कत्तल केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वृक्षतोडीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीवरुन मा.मंत्री, पर्यावरण यांनी वृक्षतोडीस स्थगिती दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असताना इतर विकासकांकडून आलेले प्रस्ताव स्थगित ठेऊन घाई-गडबडीने दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजीच्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत उक्त विकासकास वृक्ष तोडीस परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) सदर ठिकाणी क्लेरियंट कंपनीची जुनी वास्तु तोडून सीआरझेडचे उल्लघंन, खारफुटीची कत्तल करुन त्याठिकाणी भराव टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्याकडे दिनांक २० मे २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) उक्त प्रकरणी मा. मंत्री पर्यावरण यांनी दिनांक ०६.०५.२०१५ च्या पत्रान्वये सदर वृक्षतोडीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने स्थगिती देण्याबाबत प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांना कळविले होते. सदर पत्र प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्या कार्यालयामार्फत नगर विकास विभागास प्राप्त झाले होते.

तथापि, या प्रकरणी वृक्षांचे संरक्षण व जतन करण्याकरीता महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ खाली ठाणे महानगरपालिकेअंतर्गत वैधानिकरित्या स्थापन करण्यात आलेल्या वृक्ष प्राधिकरणाने विहित कार्यपध्दतीनुसार हरकती व सूचना मागवुन वृक्ष प्राधिकरणाच्या दिनांक २४.०४.२०१५ च्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आल्याची वस्तु:स्थिती आहे.
(३) हे खरे नाही.

वस्तुत: दिनांक २४.०४.२०१५ च्या वृक्ष प्राधिकरणाच्या सभेमध्से एकूण ३३ विकासकांच्या प्रस्तांवावर विचारविनिमय करुन निर्णय घेण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

तथापि, मौजे कोलशेत येथील श्रीमती उषा चरणजीत रॉय यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये सीआरझेड तरतुदीचे उल्लंघन झाल्याचे तसेच खारफुटींची झाडांची कत्तल करुन भराव टाकल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(५) व (६) तसेच याबाबत पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ केंद्र शासनाचे सागरी किनारा नियमन अधिसूचना दिनांक १९.०२.१९९१ मधील तरतुदीनुसार संबंधिताविरुध्द कापुरबावडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३०३७/२०१५ दिनांक ०९.०५.२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल केलेला आहे.

दिनांक २०.०५.२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले नाही परंतु याच विषयाच्या अनुषंगाने दिनांक ०८.०५.२०१५ रोजी प्राप्त झालेल्या निवेदानाच्या अनुषंगाने आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केबीसी चिटफंड कंपनीने केलेल्या फसवणुक प्रकरणी एजन्ट व गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२१) * ७२७२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ४५८ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १३ जानेवारी २०१० च्या शासन परिपत्रकाप्रमाणे वेळीच सक्षम कारवाई न केल्याने व फसवणुक करणाऱ्या कंपनीविरुध्द गुन्हे दाखल न करणाऱ्या परभणी स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलीस निरीक्षक यांनी स्थानिक एजन्टाना पाठीशी घातल्या बाबतचा आक्षेप मराठवाडा जनता विकास परिषदेच्या सदस्यांनी माहे ऑगस्ट २०१४ मध्ये वा त्यादरम्यान मा. अप्पर मुख्य सचिव, गृह यांच्याकडे लेखी निवदेनाद्वारे नोंदविला होता,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केबीसी प्रकरणी गुन्हा नोंदवून न घेणाऱ्या परभणी येथील पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द भा.द.वि. १६६ (अ) च्या नियमाप्रमाणे गुन्हे नोंदविण्यात यावेत अशी मागणी स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी सन २०१५ दरम्यान मा. मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध कारणे दाखवित परभणी येथील पोलीसांनी केबीसी मधील गुंतवणुकदारांच्या तक्रारी नोंदवून न घेतल्याने त्या तक्रारदारांनी परभणी जिल्हा सत्र न्यायालय व उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल केल्याने न्यायालयांनी पोलीस अध‍िक्षक, अप्पर पोलीस अध‍िक्षक व इतर पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हे नोंदवून घ्यावेत असे आदेश सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाने भा.द.वि. १६६ च्या कलमात सुधारणा करुन १६६ (अ) असा बदल करुन गुन्हा न नोंदविणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्दच गुन्हा नोंदविण्यात यावा असे आदेश माहे जुन, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान राज्य शासनास कळविल्याप्रमाणे परभणी येथील पोलीस अधिकाऱ्यांच्याविरुध्द गुन्हे नोंदविण्यात आले आहेत काय,
(५) नसल्यास, संबंधित पोलीसांचा बचाव करण्याचे धोरण राबविण्यात येत आहे काय,
(६) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४), (५) व (६) नाही.

तक्रार अर्ज प्राप्त होण्यापूर्वी दिनांक १३/०७/२०१४ रोजी केबीसी कंपनीविरुद्ध कोतवाली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१३६/१४ भा.दं.वि.कलम ४०६, ४२०, ४६८, ४७१, ३४ व एमपीआयडी ॲक्ट १९९९ च्या कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास सुरू करण्यात आला आहे. तक्रारदारांच्या तक्रारी स्विकारुन कंपनीविरुद्ध पुर्वी दाखल झालेल्या गुन्हयात सदर तक्रारीचा समावेश केलेला असून गुन्हा नोंदवून घेत नसल्याबाबतचा आक्षेप हा निराधार व तथ्यहीन असल्यामुळे पोलीस अधिका-यांविरुद्ध कारवाई करण्याचा व त्यांचा बचाव करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिकेट लावून व्याप्त करण्यात आलेले रस्ते व पदपथ मोकळे करण्याबाबत

**(२२) * ७१६७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिकेट लावून व्याप्त करण्यात आलेले रस्ते व पदपथ मोकळे करण्यासाठी पालिकेने ताज हॉटेलसह ट्रायडन्ट व स्टॉक एक्स्चेंजला कारणे दाखवा नोटीस पाठवूनही दोन्ही व्यवस्थापनांनी दुर्लक्ष केल्याचे पालिकेच्या ए विभागाचे सहाय्यक यांनी सांगितल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, रस्ते व पदपथ मोकळे करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिका-यांनी पाहणी केली असता, ताज हॉटेल बाहेरील रस्ते व पदपथावर बॅरिकेड्स लावून दगडी बांधकाम केलेले असल्याने सदर हॉटेलच्या व्यवस्थापनास दिनांक १८.०६.२०१५ रोजी रुपये ६,१४,२५,४७५/- इतके शुल्क भरण्याबाबत नोटीसाद्वारे कळविलेले आहे.

मुंबई स्टॉक एक्सचेंज यांनी रस्त्यावर उभारलेल्या बॅरिकेड्ससाठी त्यांना रुपये १,२०,०३,६००/- इतकी रक्कम भरण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीसाद्वारे कळविले आहे.

हॉटेल ओबेरॉय ट्रायडंट यांनी पदपथावर उभारलेल्या बॅरिकेड्ससाठी रुपये १६,०९,९२०/- इतकी रक्कम भरण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीसीद्वारे कळविलेले आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे हॉटेल ताज महल पॅलेस व्यवस्थापनास दिनांक १८.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांत रस्ते व पदपथ मोकळे न केल्यास सदरील रस्ते व पदपथ महानगरपालिकेतर्फे मोकळे करण्यात येतील असे कळविण्यात आलेले आहे.

हॉटेल ट्रायडेंट व्यवस्थापनाने रुपये १६,०९,९२०/- इतक्या शुल्कापैकी रुपये १४,७६,०००/- शुल्काचा भरणा केलेला आहे. तसेच हॉटेल व्यवस्थापनाने रस्त्यावर ठेवलेले बॅरिकेड्स पदपथाच्या बाजूला ठेऊन हॉटेलसमोरील पदपथ पादचा-यांकरीता मोकळा केला आहे. त्यामुळे महानगरपालिकेने सुरक्षेच्या कारणास्तव हॉटेल व्यवस्थापनास पदपथाच्या बाजूला बेरिकेड्स ठेवण्यास परवानगी दिलेली आहे.

मुंबई स्टॉक एक्सचेंज व्यवस्थापनास रस्त्यांवर लावलेल्या बॅरीकेड्समुळे निर्माण होणारा अडथळा काढून टाकण्यास तसेच महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेल्या शुल्काचा भरणा करणेबाबत दिनांक ०८.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील उड्डाणपुलाखाली अनधिकृतपणे होणाऱ्या पार्किंगबाबत

**(२३) * ६८२८ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उड्डाणपुलाखाली होणारे अनधिकृत पार्किंग बंद करावे, असे आदेश न्यायालयाने दिले असतानाही शहरातील अनेक उड्डाणपुलाखाली आजही मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे पार्किंग सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही उड्डाणपुलाखाली भिकारी व अंमलीपदार्थ सेवन करणाऱ्यांनी आपले अड्डे तयार केले असून त्याठिकाणी घातपात होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब क्रमांक १ व २ नुसार शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने अनधिकृत पार्किंग तात्काळ बंद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय. तथापि, उड्डाणपुलाखाली असलेले भिकारी तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुद्ध वेळोवेळी पोलीसांकडून कारवाई करण्यात येते.

(३) व (४) मुंबई शहरातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी बांधलेल्या उड्डाणपुलाखाली होणारे पार्कींग सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.६.२००८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बांधलेल्या उड्डाणपुलाखालील जागा पे ॲण्ड पार्क तत्त्वावर कंत्राटदारांना देण्यात आल्या होत्या. त्या जागा ताब्यात घेण्यात आल्या असून त्यांचे सुशोभिकरण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीचे सेफ्टी ऑडिट नियमित करण्याबाबत**

**(२४) * ७९७९ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीचे यावर्षीचे सेफ्टी ऑडिट फायर फायटींग यंत्रणामध्ये त्रुटी आढळल्यामुळे आणि प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे झाले नसल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाकडून ऑडिट नियमित (दरवर्षी) होण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये अस्तित्वात असणारी अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम व अद्ययावत करण्यासाठी वाढीव यंत्रणा बसविण्याचे काम सुरु असल्याने यावर्षीचे सेफ्टी ऑडिट झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

वाढीव यंत्रणा बसविण्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन असून तद्नुतर पुणे महानगरपालिकेमार्फत फायर सेफ्टी ऑडीट करुन घेण्यात येणार आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**कळवा (जि.ठाणे) येथील ९१ धोकादायक इमारतींची पुनर्तपासणी करण्याबाबत**

**(२५) * ८१२७ श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील ९१ धोकादायक इमारतींना ठाणे महानगरपालिका प्रशासनाने जागा रिकामी करण्याच्या नोटीसा बजावल्या असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी येथील रहिवाशांनी स्वत:च्या खर्चाने अनेक इमार्तींची दुरुस्ती केली असल्याने या इमारतीची पुन्हा पाहणी करुन शहानिशा करावी, अशी मागणी येथील रहिवाशांनी संबंधीत विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्वखर्चाने बांधलेल्या इमारतीची शासनाने पुनर्तपासणी केली आहे काय,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेमधील कळवा प्रभाग समिती अंतर्गत ८४ धोकादायक व अतिधोकादायक इमारती अशा एकूण ९१ इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४(१), (२) व (३) नुसार नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत. तसेच दिनांक १९.०४.२०१५ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात अशा इमारतीला निवासी वापराकरीता अत्यंत धोकायदायक असल्याबाबतच्या नोटीसा बजावून अशा इमारतींचा वापर न करण्याबाबत जाहिर आवाहन करण्यात आले होते.

महानगरपालिका अधिनियमातील कलम २६८ (५) अन्वये ३७ इमारतींना, खाली करण्याबाबत पोलीस विभागास कळविण्यात आलेले आहे व उर्वरित ४६ इमारतीबाबत कलम २६८(५) अन्वये तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) व (३) होय.

कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील २ धोकादायक इमारतींची दुरुस्तीस परवानगी देण्याबाबतची मागणी आली होती. त्यानुसार सदर इमारतींची तपासणी महानगरपालिकेच्या पॅनेलवरील तांत्रिक सल्लागारांमार्फत संबंधित रहिवाशी संघ/इमारत मालकाकडून माहे जुलै, २०१५ अखेरपर्यंत करुन घेण्यात येत आहे.

७ अतिधोकादायक इमारतीपैकी ६ इमारती निष्कासीत करण्यात आल्या आहेत. एका इमारतीबाबत स्थैर्यता प्रमाणपत्र तपासण्याकरिता व्हि.जे.टी.आय. संस्थेमार्फत तात्रिक अहवाल प्रलंबित आहे.

मुंबई महानगरपालिकेने धोकादायक इमारतींबाबत तयार केलेल्या प्रणालीची पृष्टी. मा. उच्च न्यायालयाने केलेली आहे. सदर योजना ठाणे महानगरपालिकेने अंगिकृत करावी याबाबत त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतुकीची होणारी कोंडी व अपघाताची संख्या कमी करण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(२६) * ७७२० श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल तटकरे, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे, महाड, नागोठाणे ही ठिकाणे धोकादायक असल्याने त्या मार्गावरील वाहतुकीची होणारी कोंडी व अपघाताची वाढती संख्या लक्षात घेता मृत्यूचा सापळा झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात परिवहन विभाग, पोलीस व महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार प्रश्न भाग (१) बाबत वाहतुकीची होणारी कोंडी व अपघाताची संख्या कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना सुचविल्या आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे येथे सन २०१३ पासून मे, २०१५ या कालावधीत झालेल्या २ अपघातांमध्ये १ मयत व दोन जण जखमी झालेले आहेत.

महाड आणि नागाठाणे या ठिकाणी सन २०१३ पासून झालेल्या अपघातांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| सन | | २०१३ | २०१४ | मे, २०१५ अखेर |
|---|---|---|---|---|
| महाड | अपघात | १२७ | १११ | ४६ |
| | मृत्यू | २१ | २० | १३ |
| नागाठाणे | अपघात | ५६ | ६६ | २८ |
| | मृत्यू | १९ | ९ | ८ |

पळस्पे येथे राष्ट्रीय महामार्ग क्र.४, ४ब व १७ असे तीन महामार्ग एकत्र येतात. तसेच, मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू असल्याने ब-याच ठिकाणी वाहतूक वळविण्यात आलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी वाहतूकीचा वेग कमी होतो.

(२) पळस्पे येथील वाहतूक कोंडीबाबत नवी मुंबई पोलीस वाहतूक शाखेने सर्व संबंधितांची बैठक आयोजित केली होती.

(३) पळस्पे सर्कल या ठिकाणी ४ रस्ते एकत्रित येतात. आणि हलके, जड-अवजड वाहनांची वाहतूक जास्त प्रमाणात आहे. या ठिकाणी वाहतूक कोंडी होवू नये याकरीता वाहतूक कर्मचा-यांची नियमित नेमणूक करण्यात येते. रात्रीच्या वेळी अंधारात वाहनांचा अपघात होवू नये याकरीता पळस्पे सर्कल येथे हायमास्ट उभारण्यात आले आहे. तसेच, गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. त्यामुळे अपघातांची संख्या नियंत्रणात आलेली आहे.

अपघातप्रवण क्षेत्र, धोकादायक वळणे, वेगमर्यादा, असे सूचना फलक लावण्यात आले आहेत. उक्त ठिकाणी रॅम्बलर स्ट्रिप, गतिरोधक बसविण्यात आले आहेत. नागोठाणे याठिकाणी रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे सदर ठिकाणी फायबर डिव्हायडर व सूचना फलक लावण्यात आलेले आहेत. महामार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरीता रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विविध कार्यक्रम राबवून वाहन चालक व मालकांच्या सभा घेऊन त्यांना मार्गदर्शन व त्यांच्यामध्ये वाहतूक नियमनाबाबत जागृती करण्यात येते. वाहन चालकांच्या मार्गदर्शनाकरीता विविध सूचनांचे फलक लावणे, साईड पट्टया भरणे, गतिरोधक लावणे, रॅम्बलिंग स्ट्रीप लावणे, कॅट आईज लावणे याकरीता संबंधित अधिका-यांशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच, मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या कसुरदार वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत सन २०१३ ते मे, २०१५ पर्यंत एकूण १,५३,९१० केसेस करुन रु.१,५६,५५,३००/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या जिल्हा वाहतूक शाखेने सन २०१४ ते माहे मे, २०१५ पर्यंत एकूण ९४,१५६ केसेस करुन रुपये १,१६,२६,२००/- एवढा दंड वसूल केला आहे.

-----------------

**मुंबईतील म्हाडाच्या १५० हेक्टर अतिक्रमित जमिनीवर**
**झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याबाबत**

**(२७) * ६७५४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या १५० हेक्टर अतिक्रमित जमिनीवर परवडणारी घरे बांधण्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास योजना (एसआरए) राबवण्याच्या म्हाडाच्या योजनेकडे दुर्लक्ष करुन ही सर्व जमीन खाजगी विकासकांच्या ताब्यात देत असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत म्हाडाकडे घरे बांधण्यासाठी पुरेशी जमीन नसल्यामुळे म्हाडाच्या अतिक्रमित जमिनीवरच झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयामुळे भविष्यात सर्वसामान्यांना म्हाडाच्या कोणती घराचे स्वप्न विसरावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर निर्णयावर फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबईमध्ये म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या जमिनीवर काही ठिकाणी झोपडपट्टया असून शासनाच्या प्रचलित धोरणांनुसार सदर झोपडयांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. म्हाडा प्राधिकरणाच्या दिनांक ०६.०८.२०१३ च्या ठरावानुसार अशा झोपडपट्टयांचा विकास म्हाडातर्फे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि वरील ठरावापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्यांच्यातर्फे म्हाडाच्या जमिनीवर राबविण्यात येणाऱ्या एकूण ९६ प्रकरणांमध्ये परिशिष्ट २ तयार करण्यास म्हाडास कळविले होते. त्यापैकी ७ प्रस्ताव पुनरावृत्ती झालेले असल्याने उर्वरित ८७ प्रस्ताव प्रलंबित होते. त्यापैकी १५ प्रकरणांची म्हाडातर्फे योजना राबविल्यास हाऊसिंग स्टॉक उपलब्ध होणार नाही असे निदर्शनास आल्याने सदर १५ प्रकरणांसाठी म्हाडाने ना हरकत प्रमाणपत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दिले आहे.

उर्वरित ७२ प्रकरणांपैकी पहाडी, गोरेगाव येथील २२ झोपड्यांबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असून तुर्तास त्या प्रकरणांमध्ये परिशिष्ट २ ची कार्यवाही शक्य होत नाही. सुमारे १८ ते २० हेक्टर इतक्या जागेवरील शिल्लक ५० प्रकरणांमध्ये म्हाडाच्या ठरावाप्रमाणे म्हाडाकडून पुनर्विकास करावयाचा होता. तथापि, मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित श्री.अवधेश तिवारी विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणातील मा.मुंबई उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश विचारात घेता सदर ५० प्रकरणांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने यापूर्वीच योजना प्रस्तावित केलेली असल्याने त्यावर म्हाडाकडून योजना राबविता येणार नाही असा ठराव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ०१.०१.२०१४ रोजी मंजुर केला आहे. या परिस्थितीत वर नमूद १५ ते २० हेक्टर जमिनीवरील ५० प्रकरणांमध्ये म्हाडाकडून परिशिष्ट २ ची कार्यवाही करण्याचे म्हाडाच्या विचाराधीन आहे.
(३) हे खरे नाही. म्हाडाच्या जमिनीवर परवडणाऱ्या घरांच्या योजना राबविण्याचे म्हाडाचे धोरण असून त्यानुसार म्हाडाकडून जास्तीत जास्त परवडणारी घरे बांधण्यासाठी योजना प्रस्तावित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चेंबूर (मुंबई) येथे खाजगी इन्स्टीटयूट स्थापन करून विद्यार्थ्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याच्या घटनेबाबत**

**(२८) * ७११७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॅकेनिकलचे चांगले शिक्षण देण्याचे आमिष दाखवून खाजगी इन्स्टीटयूट स्थापन करत एका ठगाने विद्यार्थ्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याची घटना चेंबूरमध्ये माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारचा गुन्हा चेंबूर पोलीस ठाणे येथे दाखल झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शिरगाव (ता.अलिबाग जि.रायगड) येथील श्री.अलिखान हमीदखान पठाण यांच्या कुटुंबियांना तेथील मुस्लीम समाजाने वाळीत टाकल्याबाबत**

**(२९) * ८३४१ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील श्री.अलिखान हमीदखान पठाण यांच्या कुटुंबियांना तेथील मुस्लीम समाजाने मागील ३० वर्षापासून वाळीत टाकले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी श्री.पठाण यांनी पोयनाड पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.पठाण यांनी दिलेला तक्रार अर्ज पोयनाड पोलीस ठाणे येथे दिनांक ३०.४.२०१५ रोजी प्राप्त झाला आहे.

(३) याप्रकरणी श्री.पठाण यांना वाळीत टाकलेले नसून तक्रार केलेल्या व्यक्तींशी त्यांचे चांगले संबंध असून त्यांना कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी मज्जाव केलेला नाही. सर्व समाज त्यांच्या घरगुती कार्यक्रमांना हजर असतो. तसेच श्री.पठाण यांचे तक्रार केलेल्या व्यक्तींशी वैर नसल्याचे चौकशीत आढळून आले आहे. सदर प्रश्न सामोपचाराने मिटवण्यासाठी पोयनाड पोलीस ठाण्यात बैठक घेण्यात आली. त्यात कोणतीही तक्रार नसल्याचे श्री.पठाण यांनी जबाबत नमुद केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्याबाबत**

**(३०) * ८३००  श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याबाबत विधी व न्याय विभागाचा व महसूल विभागाचा अहवाल राज्य शासनास प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामांना निर्बंध/आळा घालण्याकरिता धोरण ठरविण्यासाठी नेमलेल्या समितीने दि. ०५/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर अहवालाचे अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

(२) राज्यातील नागरी भागातील बेकायदेशिर बांधकामांना निर्बंध/आळा घालण्याकरीता धोरण ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालामध्ये कोणती बांधकामे नियमीत होऊ शकतील तर कोणती बांधकामे नियमीत होणार नाहीत याची स्पष्टता केलेली आहे. शासन स्तरावर समितीचा अहवालातील शिफारशीचा अभ्यास करुन त्यावर शासनातर्फे अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

(३) लागू नाही.

-----------------

**मुंबईतील विविध भागातील नागरिकांना जल जोडण्या देण्याबाबत**

**(३१) * ६९४९ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला, लोटस कॉलनी, बैंगनवाडी, शिवाजीनगर, गोवंडी, देवनार येथे माहे जानेवारी, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत पालिकेकडे पाण्याच्या जोडणीसाठी अर्ज केलेल्यांची संख्या १७० च्या वर असून रितसर प्रक्रिया पूर्ण करुनही पाण्याच्या जोडण्या मिळत नसल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रितसर अर्ज केलेल्या सर्वसामान्य नागरिकांना पाण्याच्या जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) जानेवारी, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत कुर्ला येथे नवीन जलजोडण्या देण्याबाबत ४८२ अर्ज तर लोटस कॉलनी, बैंगनवाडी, शिवाजीनगर, गोवंडी, देवनार या एम/पूर्व विभागात नवीन जोडण्या देण्याबाबत २५२७ अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त झाले आहेत.

त्यापैकी कुर्ला विभागात एकूण ४१७ तर एम/पूर्व विभागातील १८२७ इतक्या जलजोडण्यांचे प्रस्ताव मंजूर करुन त्यांना जलजोडण्या देण्यात आल्या आहेत.

उर्वरित अर्जदारांनी त्यांना जलजोडणीबाबतची कागदपत्रे व अटी व शर्तीची पूर्तता केल्यानंतर त्यांना जलजोडणी देण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रचलित नियमानुसार करण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातील गुंठेवारी वसाहती व सातारा देवळाई (औरंगाबाद) परिसरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत**

**(३२) * ७४५५ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३९४७ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी मुंबई महापालिका आयुक्ताच्या अध्यक्षतेखालील समितीने दिलेला अहवाल शासनाने तत्वत: मान्य केल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या शिफारशीमुळे राज्यातील ७० ते ७५ % अनधिकृत बांधकामे नियमित होण्यास मदत होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहरातील गुंठेवारी वसाहती व सातारा देवळाई (औरंगाबाद) परीसरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी कार्यवाही करणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) राज्यातील नागरी भागातील बेकायदेशिर बांधकामांना निर्बंध/आळा घालण्याकरीता धोरण ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालामध्ये कोणती बांधकामे नियमीत होऊ शकतील तर कोणती बांधकामे नियमीत होणार नाहीत याची स्पष्टता केलेली आहे. शासन स्तरावर समितीच्या अहवालातील शिफारशीचा अभ्यास करुन त्यावर शासनातर्फे अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

(३) समितीचा अहवाल हा राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत आहे यामध्ये औरंगाबाद महानगरपालिका तसेच सातारा देवळाई (औरंगाबाद) यांचाही समावेश आहे.

(४) समितीने सादर केलेल्या अहवालावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## दादर (मुंबई) रेल्वे स्थानकाच्या केशवसुत उड्डाणपूलाखाली फेरिवाल्यांनी केलेले अतिक्रमण

**(३३) * ७२३३ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील केशवसुत उड्डाणपूलाखाली रिकाम्या गाळयांच्या ठिकाणी अनधिकृत फेरिवाल्यांनी अतिक्रमण करण्यास सुरुवात केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविक वरिल जागा पूर्वी अवनी ट्रस्ट सह अनेक संस्थांना भाडेतत्वावर देण्यात आली होती नंतर ही जागा मनपाने ताब्यात घेऊन कार्यालय तोडली व गाळे सर्वसामान्यांना खुले केले मात्र या खुल्या केलेल्या जागेत सुशोभिकरणाचे काम सुरु असुनही प्रत्यक्षात हे गाळे काही असामाजिक तत्वानी ताब्यात घेतले असुन त्या जागा काही फेरीवाल्यांना भाडयाने दिल्या आहेत हे पाहता शासनाने याबाबत चौकशी करुन अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) महानगरपालिकेमार्फत शिवाजी पार्क पोलीस ठाणे व दादर पोलीस ठाणे यांच्या मदतीने दोन सत्रात कवी केशवसूत उड्डाणपुलाखालील गाळे व परिसरातील अनधिकृत फेरिवाल्यांवर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई नियमितपणे करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (मुंबई) येथील रमाबाई आंबेडकर नगरमध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत मोबाईल टॉवर्सबाबत

**(३४) * ७६४८ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटकोपर (मुंबई) येथील रमाबाई आंबेडकर नगरमध्ये सन २०१० मध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत मोबाईल टॉवर्समुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून पालिकेचे एन विभाग कार्यालय याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे मोबाईल टॉवर्स उभारणा-या पंकज गुप्ता नावाच्या व्यक्तीच्या जाचास कंटाळून तेथील त्रस्त रहिवाशांनी जनआंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अनधिकृत टॉवरवर कारवाई करावी म्हणून तेथील नागरिकांनी मुंबई महानगरपालिकेच्या एन विभाग कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गत पाच वर्षापासुन पाठपुरावा करत असताना संबंधित प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्याविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "एन" विभाग कार्यालयात याबाबत रहिवाशांकडून वेळोवेळी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) हे खरे नाही. सदर अनधिकृत टॉवरच्या विरोधात महानगरपालिकेमार्फत दिनांक ०५/०४/२०१० रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमांतर्गत कलम ५३(१) अन्वये श्री. अमरनाथ गुप्ता व मेसर्स भारती इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्याविरुध्द नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच सदर नोटीसधारकांविरुध्द महानगरपालिकेमार्फत पंतनगर पोलिस ठाणे येथे दिनांक ११.१०.२०१० रोजी प्रथम खबरी अहवाल नोंदवून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तथापि टॉवर ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रोवायडर्स असोसिएशन आणि इतर यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. २०४३/२०१४ दाखल करण्यात आलेली असून, मा. उच्च न्यायालयाने, मोबाईल टॉवर्स बंद करण्याकरिता व त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याकरिता कारवाई करु नये व ज्या ठिकाणी अशाप्रकारे वीज पुरवठा खंडीत केलेला असेल तर पुन्हा त्याची जोडणी करावी असे आदेश दिनांक १२.०९.२०१४ रोजी महापालिका व इतर प्राधिकरणांना दिले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने कांदिवली (मुंबई) येथील ठाकूर व्हिलेज मधील झाडांची कत्तल केल्याबाबत

**(३५) * ८२२० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी जागावरील झाडांच्या फादयांची छाटणी करण्याची परवानगी घेतलेल्या बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या उद्यान विभागाने कांदिवली येथील ठाकूर व्हिलेज मधील ९० फूट रोड जंक्शन ते शिवम हॉटेल रस्त्यावरील १५८ झाडांची बुंध्यापर्यत तोडणी नेमलेल्या कंत्राटदाराने केली आहे अशी तक्रार तेथील रहिवाश्यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) तसेच झाडाची छाटणी करण्याऐवजी बुंध्यापर्यंत तोडणी करणारे कंत्राटदार आणि त्याकडे दुर्लक्ष करणारे उद्यान विभागाचे अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(५) तसेच विकासकांना नवीन इमारती बांधताना चारही बाजूस झाडे लावणे सक्तीचे करणार काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अश्या प्रकारची तक्रार प्राप्त झाली होती हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने, महानगरपालिकेमार्फत पाहणी केली असता, महानगरपालिकेच्या आर/दक्षिण विभागातील ठाकुर कॉम्पलेक्समध्ये ९० फुट रोड जंक्शन शिवम हॉटेल रस्त्यावरील १५८ झाडे बुंध्यापर्यंत कापण्यात आलेली नसून सदर झाडांची अतिरिक्त वाढ झालेल्या फाद्यांची छाटणी महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले.

तसेच सदर ठिकाणी ६ पर्जन्य वृक्ष, मिलीबग या किटकाच्या प्रादूर्भावाने मृत झाली असल्याचे निदर्शनास आले. सदर मृत वृक्ष / फांदी पडून जीवित वा वित्त हानी टाळण्यासाठी सदर मृत वृक्ष कापण्यात आले आहेत.

तथापि सदर रस्त्यावरील झाडांची छाटणी योग्य प्रमाणात करण्यात आलेली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी कंत्राटदार अथवा अधिकारी दोषी आढळून आले नाही.
(५) वृक्ष प्राधिकरणाच्या मानकानुसार प्रती १०० चौ.मी. मोकळ्या जागेसाठी २ वृक्ष व प्रती १०० मी. मनोरंजन मैदानासाठी ५ वृक्ष लावणे विकासकास बंधनकारक आहे.

-----------------

## कळवा (ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात वैद्यकीय सुविधांचा असलेला अभाव

**(३६) * ७५४६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा (ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात वर्षाला सुमारे ११०० रुग्णांच्या तसेच दर दिवसाला ४ ते ५ रुग्णांच्या मृत्युच्या घटना घडत असल्याचे दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात तातडीने औषधोपचार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने औषधांचे दुकान नसल्याने तसेच डॉक्टर सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी रुग्णालयातच येत नसल्याने रुग्ण मृत्यू पावत असल्याच्या घटना घडत असल्याचे स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका प्रशासनास व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री ठाणे जिल्हा यांचेही त्याचसुमारास (दिनांक १ मे, २०१५) निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करुन न देणाऱ्यांविरुध्द व अनुपस्थित राहणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दिनांक १ मे २०१५ ते ३० जून २०१५ कालावधीत १६७ मृत्यू झाले असून मृत्यूचे सरासरी प्रमाण २ ते ३ प्रतिदिन इतके आहे.
(२) सदरहू विषयासंदर्भात मा. पालकमंत्री अथवा महानगरपालिकेच्या प्रशासनास निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई मधील मेट्रो रेल्वे टप्पा-३ हयाकरिता काही इमारती बाधित होत असल्याबाबत

**(३७)** * **८४२५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मधील मेट्रो रेल्वे टप्पा-३ हयाकरिता काही इमारतींना हलवावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये शासनाच्या कोणत्या मुख्य इमारतींचा समावेश आहे,
(३) इमारती हलवण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-३ च्या सी.एस.टी. स्थानकामुळे आझाद मैदान येथील नियंत्रक शिधावाटप यांच्या अधिपत्याखालील कार्यालय, महालक्ष्मी मेट्रो स्थानकामुळे नागरी संरक्षण व होमगार्ड कार्यालय, एम.आय.डी.सी. स्थानकामुळे गुन्हे प्रकटीकरण शाखा/गुन्हे अन्वेषण विभाग व पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थाने बाधित होत आहेत. तसेच विधानभवन स्थानकामुळे अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र प्रशासकिय न्याय प्राधिकरण, अभियोग संचालनालय, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र इत्यादी १७ कार्यालये बाधित होत आहेत.

(३) सदर प्रकल्पाच्या कालावधीत शासकीय कार्यालयांची जागा ही फार थोडया प्रमाणात कायमस्वरुपी लागणार असुन बहुतांशी जागा ही प्रकल्प पूर्ण होई पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात लागणार आहे. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर संबंधित कार्यालयाला नियमाप्रमाणे अनुज्ञेय जागा त्याच ठिकाणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एम.एस.आर.सी.एल) मार्फत इमारत बांधून देण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्पाचे कामकाज चालू असताना शासकीय कार्यालयांना सध्या ते ज्याठिकाणी आहेत त्या ठिकाणच्या जवळपास शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी जागा भाडेतत्वावर घेवून स्थलांतरित करण्याचे नियोजित आहे.

विधानभवन स्थानकामुळे बाधित होणाऱ्या शासकीय कार्यालयांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शनानुसार खाजगी जागा भाडेतत्वावर घेण्यात येत आहेत व त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. त्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे.

-----------------

**केईएम रुग्णालयात परळ (मुंबई) डॉक्टर आणि परिचारिकांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू**

**(३८) * ८८७४ श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लालबाग (मुंबई) येथे राहणारे श्री.रमेश सोनोने यांची पत्नी श्रीमती ममता सोनोने यांना केईएम रुग्णालयात दिनांक २० सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले असताना ड्युटीवर असणाऱ्या डॉक्टर आणि परिचारिकांच्या हलगर्जीपणामुळे चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्य माहिती आयुक्त यांनी गैरहजर राहिलेल्या डॉक्टरांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली असता संबंधितांवर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

डयुटीवर असलेल्या डॉक्टर आणि परिचारीकांच्या हलगर्जीपणामुळे चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे श्रीमती ममता सोनाने यांच्या मृत्यू झाला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**देगलूर (ता.जि.नांदेड) येथील दत्तनगर नं. २ या भागातील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३९) * ८९३१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगलूर (ता.जि.नांदेड) येथील दत्तनगर नं. २ या भागातील अंतर्गत रस्त्याची दुरवस्था झाली असून सदर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने तसेच मुरुमाऐवजी लाल मातीचा उपयोग करण्यात आल्याने मुख्य अंतर्गत रस्ते निसरडे झाले असून या रस्त्यावर नेहमीच अपघात होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करुन सदर रस्ता नियमाप्रमाणे न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**लातूर येथील विशाल नगर भागातील लोकांची हिंम्बज् हॉलिडे या कंपनीने लोकांची फसवणूक केल्याबाबत**

**(४०) * ९२३३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील विशाल नगर भागात सन २०११ पासून कार्यरत असलेल्या हिंम्बज् हॉलिडे या टूर्स अँड ट्रॅव्हल्र्सचा व्यवसाय करणाऱ्या कंपनीत लोकांनी गुंतवणूक केलेल्या रु.१ कोटी ३ लाख १० हजार ९०० इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार अपहार प्रकरणी संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे,

(३) अद्याप, चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

प्रकरणी हिंम्बज् हॉलिडेज प्रा.लि. कंपनीच्या १७ संचालकाविरुध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी लातूर येथे गु.र.नं. ८७/१५ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,३४ व एमपीआयडी ॲक्ट १९९९ कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) गुन्ह्याप्रमाणे ७ आरोपींना दि.१३/०५/१५ रोजी अटक करुन दि.२६/०५/१५ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड घेवून तपास करण्यात आला तसेच सदर कंपनीच्या कार्यालयातून दस्तावेज तपासासाठी जप्त केले आहेत.

आर्थिक गुन्हे शाखा मुंबई यांनी गु.र.नं. २०/१४ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ व एमपीआयडी कलम ३ मध्ये दोषारोप दाखल करुन कंपनीचा मालमत्ता संरक्षित केली असल्याचे दोषारोप पत्रामध्ये नमूद आहे. उर्वरित आरोपींना अटक करणे व पुरावा हस्तगत करणेवर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**नाशिक शहरातील काझीगढीला संरक्षण भिंत बांधण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४१) * ९३४५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ४८३९ ला दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील काझीगढी दर पावसाळयात कोसळत असल्यामुळे आगामी पावसाळयात येणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयामध्ये सदर गढी कोसळून दुर्घटना टाळण्यासाठी या गढीला संरक्षण भिंत बांधण्याची लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने सदरचे कामासाठी शासनाकडून निधी दिला जावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) नाशिक महानगरपालिका हद्दीतील काझीगढी या भागामध्ये वारंवार होणारे भूस्खलन विचारात घेऊन, या ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याचे काम हे सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने, नाशिक महानगरपालिकेला मंजूर केलेल्या निधीमधून घेण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील आदिवासींच्या जागेमध्ये होणारी अनधिकृत बांधकामे**

**(४२) * ९६१२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वे नं. १४५, हिस्सा नं. १, ३ व ४ मौजे मिरा सर्वे नं. १४५/१ ते ४ (जुना) १६/१ ते ४ (नवीन) या आदिवासींच्या जागेमध्ये बांधकामाची परवानगी न घेता बांधकामे सुरु असल्याची बाब माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बांधकामांबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दामरचा (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील उपसरपंच यांची नक्षलवाद्यांनी गोळया घालून हत्या केल्याची घटना**

**(४३) * ९८०० श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दामरचा (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील उपसरपंच यांची नक्षलवाद्यांनी गोळया घालून हत्या केल्याची घटना दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नक्षल कारवाया रोखण्यासाठी कोणती उपाययोजना आखली आहे वा आखण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत :-

१) शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.

२) जिल्ह्यातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अंकुश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते. तसेच एरिया डॉमिनेशन कार्यवाही करून नागरिकांना सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे.

३) जिल्ह्यात नक्षलविरोधी कृतीकरिता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जवानांना युद्धप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालींवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण डोंबिवलीतील कल्याण पूर्व भागातील सुचक नाका येथील स्वच्छतागृहासाठी आरक्षित भूखंडावर झालेले अतिक्रमण**

**(४४) * १०००२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवलीतील कल्याण पूर्व भागातील सूचक नाका भागात सार्वजनिक स्वच्छता गृहांच्या जागांवरही बेकायदा मजले उभे करण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण पूर्व भागातील सूचक नाका भागात स्थानिक रहिवाशांकडून मागील दोन वर्षांपासून नियमित वापर होत असलेल्या सदरहू शौचालयाचे बांधकाम महानगरपालिकेची कोणतीही परवानगी नसताना रात्रीच्या वेळी जेसीबी लावून पाडण्यात आल्याची गंभीर घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने दखल घेऊन चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) व (४) सदर शौचालय तोडले गेल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेकडून संबंधित विकासकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत नोटीसा बजाविण्यात आली आहे. तसेच संबंधित विकासकाविरुध्द महानगरपालिकेकडून पोलीस स्थानकात एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मशिदबंदर येथे राहणाऱ्या एका महिलेला अहमदाबाद (गुजरात) येथे विकल्याच्या घटनेबाबत**

**(४५) * १००५६ श्री.गुरुमुख जगवानी, श्री.हेमंत टकले, श्री.संजय दत्त, श्री.अनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मशिदबंदर येथे राहणाऱ्या रजिया नावाच्या महिलेला अहमदाबाद (गुजरात) येथे रिमा नावाच्या महिलेने कॅटरिंग कामासाठी बोलावून एक लाख रुपयास विकल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कामाचे अमिष दाखवून महिलेची फसवणूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या संदर्भात पायधुनी पोलीस ठाण्याने केलेल्या तपासात पायधुनी पोलीस ठाण्याचे हद्दीतील ३ तरुणींनी चांगल्या पगारावर कॅटरींगच्या कामाचे आमिष दाखवून गुजरात राज्यातील खेडेगावात पैसे घेऊन त्यांचे लग्न लावुन देण्यात आले असल्याचे आढळून आले आहे.
(३) या संदर्भात पायधुनी पोलीस ठाणे येथे गुरक्र. १२२/१५ कलम ३७०, ३७० (अ). ३७६, ३६३, ३४३, ३४४, १२० (ब) भादंविसं कलम ४, ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यात ७ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील अष्टविनायक सिनेव्हीजनच्या व्यवस्था प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(४६) * ७८०४ श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.अनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अष्टविनायक सिनेव्हीजनच्या व्यवस्था प्रक्रिया संचालकाने ८२३ कोटीचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१४ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी दिनांक २९.०७.२०१४ रोजी आंबोली पोलीस स्टेशन गुनोक्र २५८/२०१४ भादंविस कलम-४०६,४२०,१२० (ब) ३४ नोंद असून सदरचा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा गुरक्र/७०/२०१४ अन्वये हस्तांतर करुन गुन्हयाचा तपास करण्यात आला आहे. गुन्हयामध्ये बनावट कागदत्रे तयार करुन ती खरी म्हणून वापरली असल्याने भादंविसं कलम ४०९,४६५,४६७,४६८,४७१,४७७-अ चा समावेश करण्यात आला आहे.

सदर गुन्हयामध्ये आरोपीत कंपनीचे संचालकासह कंपनीचे चार्टर्ड अकांउंटंट व काही खाजगी इसम असे एकुण १३ आरोपीतांना अटक करण्यात आलेली असून त्यापैकी ०७ आरोपींना मा.न्यायालयाने जामीन मंजूर केलेला असून ०६ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

तसेच न्यायालयीन कोठडीतील ०३ आरोपीविरुध्द मा.अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, ४७ वे न्यायालय, मुंबई याचे न्यायालयात दिनांक २९.१२.२०१४ रोजी दोषारोपत्र व त्यानंतर दिनांक ०९.०७.२०१५ रोजी पुरवणी दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असून मा. न्यायालयाच्या आदेशाने गुन्हयाचा पुढील तपास सीआरपीसी कलम १७३ (८) अन्वये चालू ठेवण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथे गरीबांसाठी खाटा राखून न ठेवणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत

**(४७) * ७८१७ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेची क्षमता नसल्याने मुंबईतील रुग्णालयांमधील काही खाटा अनेक जागा गरीबांसाठी राखून ठेवण्याच्या अटींवर खाजगी रुग्णालयांना भाडेतत्वावर देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अटीचे पालन रुग्णालय संस्था करीत नाहीत ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने रुग्णालयांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर संस्थांचे करार रद्द करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील पत्रकारांसाठी उभारण्यात आलेले पत्रकार भवन पुनर्विकासाच्या नावाखाली विकासकास दिल्याबाबत**

**(४८) * ७७७३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील गावदेवी मैदानाजवळ सरकारी भूखंडावर उभारलेले पत्रकार भवन गेल्या २२ वर्षापासून बेकायदेशिररित्या ताब्यात ठेऊन पुनर्विकासाच्या नावाखाली पत्रकार, काही विकासक व शासनाची फसवणूक करणारा ठेकेदार विकासक राजन शर्मा यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंड ठाणे जिल्ह्यातील पत्रकारांसाठी पत्रकार भवन उभारण्यासाठी १९८८ साली शासनाकडून देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबंधित गुन्हेगारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) ठाणे जिल्ह्यातील गावदेवी मैदानाजवळ सरकारी भूखंडावर उभारलेले पत्रकार भवन बेकायदेशीररित्या ताब्यात ठेवून पुनर्विकासाच्या नावाखाली फसवणूक करण्या-या दोन व्यक्तींविरुद्ध् नौपाडा पोलीस ठाणे येथे गुरक्र. २४५/१५ भादंवि कलम ४२०, ५०६ प्रमाणे दिनांक ०८.०५.२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीत यांना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे.

तथापि शासनाने पत्रकार संघास दिलेल्या जमिनी संदर्भात शर्तभंग आढळून आल्याने दिनांक ३०.११.१९९९ रोजी जमीन सरकार जमा करणेचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

याशिवाय सदर जागेसंदर्भात पत्रकार भवनाच्या भूखंडावरील वास्तुचा ताबा पत्रकार संघाला न दिल्याबाबत पत्रकार संघाने दिनांक ०९.०४.२०१४ रोजी केलेल्या तक्रारीची स्थानिक चौकशी केली असता सदर भूखंडावर दोन इमारती बांधण्यात आल्या असून इमारत क्रमांक १ मधील तळमजला व्यावसायिक कारणासाठी भाडेकराराने देण्यात आला असून त्या इमातीमधील पहिल्या माळ्यावर पत्रकार संघाचे कार्यालय आहे. इमारत क्रमांक २ मधील गाळे भाडेपट्टयावर देण्यात आल्याचे निदर्शनास आल्यावरुन उप विभागीय अधिकारी, ठाणे विभाग यांनी शर्तभंगाची सुनावणीची कारवाई सुरू केली आहे. प्रकरणी पत्रकार संघाने करार केलेल्या ठेकेदाराने दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून त्यामध्ये जैसे थे परिस्थिती ठेवणेचे आदेश पारीत करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकरणी कार्यवाही प्रलंबित आहे.

सदर स्थगिती आदेश उठविणेसाठी न्यायालयास तहसिलदार ठाणे यांनी दिनांक १७.०२.२०१० रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सुधारित विकास आराखडयात गृहनिर्माण धोरणात सर्वसाधारण कामगारांना स्थान देण्याबाबत

**(४९) * ९०९८ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुधारित विकास आराखडयात गृहनिर्माण धोरणास समस्त कामगार वर्गाला केंद्रस्थानी ठेवत आणि त्यांना आरक्षण देत परवडणा-या घराबाबत योजना आखून दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ पर्यंत घोषणा करावी अन्यथा घरांचा कब्जा घेतील असा इशारा घर हक्क आंदोलन या संघटनेने शासनास दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनेच्या इशा-याची दखल घेवून शासनाने सर्वसामान्य कामगारांना गृहनिर्माण धोरणात स्थान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अशा प्रकारचा इशारा घर हक्क आंदोलन या संघटनेने शासनास दिला असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळण्याकरिता दिनांक २६.४.२०१५ रोजी गिरणी कामगार संघर्ष समितीतर्फे महाराष्ट्र हायस्कूल मैदान, ना.म.जोशी मार्ग, मुंबई येथे मेळावा आयोजित करण्यात आला होता.

(२) राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण अद्याप अंतिम झालेले नसून या धोरणाच्या मसुद्याच्या प्रती सर्व मा.केंद्रीय व राज्य मंत्रीमंडळातील मंत्री, राज्यातील सर्व संसद सदस्य व विधानमंडळ सदस्य तसेच प्रशासकीय विभागांना सूचना व अभिप्रायार्थ पाठविण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून सदर मसुद्यासंबंधी प्राप्त सूचना/अभिप्राय विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे मनपा अंतर्गत भाभा आस्केड पाणीपुरवठा योजनेमधील पंम्पिंग स्टेशनचे कामाबाबत

**(५०) * ८१७४ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेअंतर्गत भाभा आस्केड पाणीपुरवठा योजनेमधील पंम्पिंग स्टेशनचे काम पुर्वगणनापत्राच्या ३३% वाढीव दराने किर्लोस्कर व आयटीपी सिमेंटेशन यांना दिले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाढीव दराबाबत शासन चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मे.आय.टी.डी. सिमेंटेशन इंडिया लि. यांना निविदा दरापेक्षा ३३.७८२१% जास्त दराने सदर काम देण्यात आले आहे. ही वस्तुस्थिती आहे.

(२) वाढीव दराबाबत कारणामीमांसा खालीलप्रमाणे :-

मुदतवाढीसह दिलेल्या पहिल्या निविदेच्या अनुषंगाने ४४.५८१ % (जास्त) दराची एकच निविदा प्राप्त झाल्याने दिनांक ८.१.२०१४ रोजी सदर निविदा रद्द करण्यात आली.

मुदतवाढीसह दिलेल्या दुसऱ्या निविदेच्या अनुषंगाने एकही निविदा प्राप्त न झाल्याने दिनांक १९.६.२०१४ रोजी सदर निविदा रद्द करण्यात आली.

तिसऱ्या निविदेच्या अनुषंगाने दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी ठेकेदार मे.आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. यांची ३३.७८२१% (जास्त) सर्वात कती दराची निविदा प्राप्त झाली.

सदर कामामध्ये इनटेक चॅनेल बांधणे, पाण्याचे उच्चतम पातळीचे खाली सुमारे ३५ मी. खोलीपर्यंत काम करणे, तसेच सदर काम प्रगत तंत्रज्ञान वापरुन (कंट्रोल्ड ब्लास्टिंग) करण्याचा प्रस्ताव आहे.

सदर कामाचे स्वरुप लक्षात घेता ठेकेदार मे.आय.टी.डी. सिमेंटशने इंडिया लि. यांनी दिलेला ३३.७८२१% दर सर्वात कमी असल्याने, सदर कामाची निविदा स्थायी समितीने दिनांक ६.१.१५ रोजी मान्य केली.

प्रस्तुत कामास दिनांक २१.१.२०१५ रोजी कार्यादेश दिला असून, कामासाठी २४ महिने मुदत आहे.

प्रस्तुत प्रकरणी पुणे महानगरपालिकेतर्फे निविदा प्रक्रिया राबवून लघुत्तम दराची निविदा मान्य करण्यात आली असल्याने, चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मरीन ड्राईव्ह (मुंबई) येथील दुभाजकांवर लावलेली लाखो रुपयाची रोपटी उन्हात करपली असल्याबाबत**

**(५१) * ७२०७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरीन ड्राईव्ह (मुंबई) येथील रस्त्याची दुरुस्ती व सौंदर्यीकरणाचे महत्वाकांक्षी काम हाती घेऊन दुभाजकांवर लावलेली लाखो रुपयाची रोपटी उन्हात करपली असल्याचे व सौदंर्यीकरणासाठी लावण्यात आलेल्या पेटुनिया या रोपटयाचे आयुष्य अवघ्या काही महिन्याचे असतानाही पालिकेने मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात या सुकलेल्या झाडामुळे मरीन ड्राईव्ह रस्त्याचे सौंदर्यीकरणाऐवजी विद्रुपीकरण झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समुद्रकिनाऱ्यालगतच्य रस्त्याचे बांधकाम गेल्या वर्षी सुरु झाले या कामाअंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीसोबतच दुभाजकांवर फुलझाडे लावून सौंदर्यीकरण करण्याचेही अतंर्भुत होत असून या ठिकाणी शहरातील इतर ठिकाणी लावलेली बारमाही झुडपे लावण्याऐवजी केवळ जानेवारी ते मार्च दरम्यान फुले येणाऱ्या पेटुनियाची रोपटी लावली गेली सदरहू रोपटी एक वर्षापेक्षा अधिक जगत नसल्याने मे महिन्याच्या सुरुवातीलाच सुकून गेल्याने मरीन ड्राइव्हचा रस्ता विद्रुप दिसत असून

प्रायोगिक तत्वावर लावलेली ही रोपटी शहराच्या इतरही वाहतूक बेटावर लावण्याचा मुंबई मनपाचा विचार असून वर्षातून दोनवेळा ही रोपटी लावण्यात वाहतूक बेटावर लावण्याचा खर्च निरर्थक असून तरी या प्रकरणी शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मरीन ड्राईव्ह येथील रस्ता हा मुंबई शहरातील प्रमुख रस्त्यांपैकी एक असून सदर रस्त्याच्या पुनर्पुष्टीकरणासहीत रस्त्यामधील दुभाजकांच्या सुशोभिकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रगतीपथावर आहे.

सदर ठिकाणी सुधारीत दुभाजकांवर बहरणारी हंगामी फुलझाडे लावून परिरक्षित करण्याची तरतूद या कामामध्ये अंतर्भूत आहे. त्यानुसार सदर ठिकणी वेगवेगळया प्रकारची फुलझाडे लावण्यात येतात.

वातावरणातील बदलामुळे, प्रदुषणामुळे व उन्हामुळे करपलेली/कोमेजलेली फुलझाडे वेळोवेळी बदलण्याची तरतूद सदर कंत्राटदाराच्या कंत्राटात अंतर्भूत केलेली असून कंत्राटदारमार्फत सदर ठिकाणी फुलझाडे वेळावेळी बदलण्यात येतात.

सद्य:स्थितीत सदर ठिकाणी पावसाळयाच्या ऋतुमानानुसार रोपटी लावण्यात आलेली आहेत. प्रायोगिक तत्वावर लावलेली पेटुनियाची रोपटी शहराच्या इतर वाहतुक बेटावर लावण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा सद्य:स्थितीत विचार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## 'नाईट लाईफ' चा महिलांच्या सुरक्षेवर होणाऱ्या परिणामाबाबत मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिलेला आदेश

**(५२) * ६९८२ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'नाईट लाईफ' चा महिलांच्या सुरक्षेवर काय परिणाम होईल याचा अभ्यास करा आणि मगच निर्णय घ्या तोपर्यंत नाईट लाईफबाबत धोरण आखू नका आणि धोरण आखले असल्यास त्यावर अंमलबजावणी करु नका असे आदेश दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाईट लाईफ बाबत राज्यशासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार या नाईट लाईफ प्रस्तावाची अंमलबजावणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच अंमलबजावणी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर विषयांकित प्रस्तावावर अद्याप शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईमध्ये चेंबूर परिसरात बेकायदा रुग्णालये व नर्सिंग होम चालविण्यात येत असल्याबाबत**

**(५३) * ७३७४ श्री.विजय गिरकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर परिसरात सध्या असाध्य रोग बरे करण्याच्या नावाखाली बेकायदा विना परवाना रुग्णालये व नर्सिंग होम बिनदिकत चालविली जात असल्याची बाब माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चेंबूर व मानखुर्द परिसरात सुमारे ३७ बोगस डॉक्टर व्यवसाय करीत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने या प्रकरणी पाहणी केली आहे. सदर पाहणीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

**<u>विनापरवाना नर्सिंग होम्सबाबतः</u> -**

- एम/पूर्व विभागाच्या चेंबूर व मानखुर्द परिसरात विना परवाना नर्सिंग होम्स यांची यादी तयार करुन पुढील कायदेशीर कारवाईसाठी वेळोवेळी संबंधित पोलिस ठाण्यांकडे पाठविण्यात आलेली आहे.
- २८ विना परवाना चालविल्या जात असलेल्या नर्सिंग होम्सवर बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९, कलम ५, ६ अन्वये मा.महानगर दंडाधिकारी, कोर्ट क्र.४२, शिंदेवाडी कोर्ट, दादर येथे न्यायालयीन कारवाई चालू आहेत.
- ४ अवैध नर्सिंग होम्स बंद करण्यात आले आहेत. पोलिस उपायुक्त (परिमंडळ ७) यांच्याकडे पाठपुरावा चालू आहे.
- वैद्यकीय आरोग्य अधिकारी, एम/पूर्व यांच्या कर्मचाऱ्यांद्वारा वरील सर्व नर्सिंग होम्सची पाहणी सातत्याने केली जाते.

**<u>बोगस डॉक्टर्सबाबतः-</u>**

- अनधिकृत व्यवसायिकांची शैक्षणिक पदवी/महाराष्ट्र राज्यातील परिषदेकडे नोंदणी केलेल्या दाखल्याची प्रमाणपत्र तपासून संशयास्पद असलेल्या पदवी व नोंदणीच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती संबंधित मेडिकल परिषदेकडे शहानिशा करण्यात आली होती.
- एकूण ४५ डॉक्टरांचे नोंदणी प्रमाणपत्रे खोटी आढळली व ही संपूर्ण माहिती संबंधित पोलिस ठाण्यामध्ये तक्रार करण्यात येते.
- बोगस डॉक्टर्स संबंधित कार्यवाहीसाठी कायद्याप्रमाणे जिल्हा पुनर्विलोकन समितीचे अभिप्राय आवश्यक असून त्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीची पहिली सभा जानेवारी २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात संपन्न झाली.

तसेच मुंबई पोलिस आयुक्तालय (क्राईम ब्रांच) यांच्या नेतृत्वाखाली ४५ पैकी २३ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली व इतर २२ बोगस डॉक्टरांचे दवाखाने बंद आढळले.

विना परवाना चालविल्या जात असलेल्या नर्सिंग होम्सवर कारवाई न्यायप्रविष्ट आहे. तसेच सर्व बोगस डॉक्टरांच्या दवाखान्यांवर निरीक्षण ठेवण्यात आलेले असून आजतागायत हे सर्व ४५ दवाखाने बंद आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महापालिकेचा प्रस्तावित आराखडा रद्द करण्याबाबत**

**(५४) * ७०४८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामराव वडकुते, ॲड.अनिल परब, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या प्रस्तावित विकास आराखड्यामध्ये मोठ्या प्रमाणात त्रूटी आढळून आल्यामुळे सदर विकास आराखडा रद्द करावा या मागणीसाठी दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास मुंबईतील आझाद मैदान येथे तीव्र आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विकास आराखड्यासाठी ६ हजार ८३९ नागरिकांनी मागितलेला विविध आरक्षणाचा अहवाल, आराखडा तक्ता आणि आराखडा अभिप्राय आदीमधून मुंबई महापालिकेने तब्बल ६० लाखांची कमाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर विकास आराखड्यामुळे मुंबईच्या जुन्या इमारती, झोपडपट्टी, म्हाडाच्या इमारती आणि गृह निर्माण संस्थाच्या इमारती व कोळीवाड्यांचा पुनर्विकास कठीण होणार असल्यामुळे महानगरपालिकेचा प्रस्तावित आराखडा रद्द करण्यात आल्याचे माहे, एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू विकास आराखडा रद्द केल्यामुळे मुंबई शहराची विकासकामे व पुनर्वसनाची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू विकास आराखड्यात झालेल्या लक्षणीय चुकांमुळे मा.मुख्यमंत्री महोदयांनी ४ महिन्यांच्या आत चुका दुरुस्त करुन सुधारित आराखडा सादर करण्याबाबतचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारुप आराखडा २०१४-२०३४ संदर्भात आझाद मैदान येथे निदर्शने करण्यात आली होती.

(२) होय.

प्रारुप विकास आराखडा नकाशे, नियमावली, अहवाल पुस्तिका व प्रारुप विकास आराखडा अभिप्राय यांचा विक्रीतून दिनांक २७.४.२०१५ पर्यत रु. ५९,४८,०८७/- इतकी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे जमा झालेली आहे.

(३) प्रारुप सुधारित विकास आराखडयामध्ये आरेखनांच्या चुकांसहित इतरही चुका मोठया प्रमाणावर झालेल्या होत्या. त्याचप्रमाणे खारफुटीच्या जमिनीवर रहिवास वापराचे नियोजन दर्शविणे, ना विकास क्षेत्र मोठया प्रमाणावर कमी करणे, विकास परवानगी दिलेल्या ठिकाणी आरक्षणांचे नियोजन दर्शविणे, म्हाडास गिरणी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी प्राप्त झालेल्या क्षेत्रावरही आरक्षणे दर्शविणे, तसेच एकंदरीत नियमानुसार जिथे विकास शक्य नाही तसेच विविध कायदेशीर बंधनामुळे विकास करता येणार नाही. अशा ठिकाणी विकास प्रस्तावाचे नियोजन करणे इत्यादी बाबी निदर्शनास आलेमुळे शासनाने प्रारुप विकास योजनेमधील चुकांची सखोल शहानिशा करुन सगळया चुकांची जागेवरील परिस्थितीनुसार, गुणवत्तेनुसार नियोजनाचे दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून त्यानुरुप दुरुस्ती करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील प्रकरण तीनच्या तरतूदीचे पालन करुन प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये महासभेच्या पूर्वमान्यतेने चार महिन्याचे मुदतीमध्ये नागरिकांच्या सूचना/हरकतींसाठी पुनर्प्रसिध्द करणेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ खाली बृहन्मुंबई महानगरपालिकेस निदशे दिलेले आहेत.

(४) अशी बाब नाही.

(५) होय.

(६) सुधारीत प्रारुप आराखडा त्यामधील चुका/त्रुटीची दुरुस्ती करुन, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द करण्याचे निदेश शासनाने दिनांक २३.४.२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत. कलम २६ ते ३० खालील वैधानिक कार्यवाही पुणै करुन कलम ३१ खाली प्रारुप विकास योजना मंजूरीसाठी शासनास सादर झालेनंतर गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.

-----------------

**पिंपरी-चिंचवड महापालिका नागरवस्ती विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अपंग कल्याणकारी योजनाबाबत**

**(५५) * ६७३२ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महापालिका नागरवस्ती विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अपंग कल्याणकारी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर श्रवणयंत्राकरिता २५ नग श्रवणयंत्रे खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला असतानाही मेसर्स प्राईम सर्जिकल अँण्ड फार्मा या ठेकेदाराने बाजारात एक श्रवणयंत्र जास्तीत जास्त ७ हजार रुपयांना उपलब्ध असतानाही श्रवणयंत्रांच्या एका नगासाठी १३ हजार ४०० रुपये दर सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठेकेदाराने २५ नग श्रवणयंत्रे खरेदी करण्यास व त्यापोटी येणाऱ्या ३ लाख ३५ हजार रुपयांच्या खर्चाला मंजूरी देण्याचा प्रस्ताव समितीपुढे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर श्रवणयंत्रे घोटाळा प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे श्रवणयंत्र खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेतील दर, स्पेसिफिकेशन्सनुसार असल्याने, रुपये १३,४००/- या दराने एकूण २५ श्रवणयंत्रासाठी रुपये ३,३५,५००/- इतक्या खर्चास मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीस सादर करण्यात आला. सदर लघुत्तम दराच्या प्रस्तावास स्थायी समितीने दिनांक १६.६.२०१५ रोजी मंजूरी दिली आहे.

(४) याबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविकांनी फेर निविदा काढण्याची मागणी केल्याने, श्रवणयंत्राचे दर स्पेसिफिकेशन्सी तसेच बाजारभावाशी अनुरुप आहेत, याची खातरजमा करुन पुढील उचित कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बार्शी (जि.सोलापूर) शहरात असलेले दुकाने निरिक्षक कार्यालय मागील सहा महिन्यापासून बंद असल्याबाबत

**(५६) * ७९२७ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) शहरात असलेले दुकाने निरिक्षक कार्यालय मागील सहा महिन्यापासून बंद असल्याने व्यापाऱ्यांची दुकाने नुतनीकरणाची प्रकरणे मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक देवळाली कॅम्पमधील कर्नलने मतीमंद मुलीवर केलेला बलात्कार

**(५७) * ९११४ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळाली कॅप (जि.नाशिक) येथील सैन्यदलात सेवारत असलेल्या एका कर्नलने शेजारी राहणाऱ्या मतीमंद मुलीवर दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बलात्कार केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित कर्नलविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे,
(३) अद्याप, चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) याबाबत देवळाली कॅम्प पोलीस स्टेशनला गुरनं. २९/२०१५ भादंवि कलम ३७६(२)(एल) प्रमाणे दिनांक १.५.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आले असून, आरोपीस अटक करण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायतीतील गावठाणाच्या हद्दीपासून पाचशे मीटर परिसरात परवानगी देताना रेडिरेकनर मधील दराच्या ५०० प्रिमियम आकारण्याबाबत

**(५८) * ७९६८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीतील गावठाणाच्या हद्दीपासून पाचशे मीटर परिसरात परवानगी देताना रेडिरेकनर मधील दराच्या ५०० प्रिमियम आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच बांधकाम विकसन शुल्काबरोबरच पन्नास टक्के प्रिमियम असे दोन्ही शुल्क भरावे लागणार असल्याने परवानगी न घेता बांधकामे होवू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

महाराष्ट्रातील मंजूर करण्यात आलेल्या १६ प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये ना.विकास विभागात गावठाणापासून रहिवास वापरासाठी परवानगी देताना नजीकची जनगणनेनुसार लोकसंख्या विचारात घेऊन विवक्षित अंतरामध्ये (२०० मी./५०० मी./१००० मी./१५०० मी.) संभाव्य बिनशेती जमिनीच्या दराच्या ५०% अधिमूल्य दर आकारुन परवानगी देण्यासंबंधी संबंधित प्रादेशिक योजनेच्या नियमावलीमध्ये सुधारणा करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) ची सूचना दिनांक ०६/०५/२०१५ रोजी जनतेच्या हरकती/सूचना मागविण्यासाठी निर्गमित केलेली आहे.
(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ क ते १२४ ठ अन्वये प्रादेशिक योजनांच्या क्षेत्रामध्ये गावठाण व गावठाणा बाहेरील कोणत्याही इमारतीचा/जमिनीचा वापर बदल करावयाचा असल्यास त्या करीता विकास शुल्क (Development Charges) जमा करण्याची तरतूद आहे.

अ.क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ना-विकास क्षेत्रामध्ये गावठाण सभोवताली विवक्षित अंतरामध्ये येणाऱ्या भूखंड धारकांना बांधकाम परवानगी घेताना विकास शुल्कासह जमिनीचे अधिमूल्य जमा करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधिल कलम-१८ च्या तरतुदी नुसार प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये कोणत्याही वापराकरिता परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच याच कलमा अंतर्गत अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आहेत.
(३) लागू नाही.

-----------------

**मुंबईतील मरीन लाईन्स येथील चंदनवाडी स्मशानभूमीतील दोन शवदाहिन्या बंद असल्याबाबत**

**(५९) * ८७२३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरीन लाईन्स येथील चंदनवाडी स्मशानभूमीतील विद्युत शवदाहिनी गृहांच्या एकूण तीन शवदाहिनींपैकी दोन शवदाहिन्या या दिर्घकाळापासून बंद अवस्थेत असल्यामुळे अंत्यविधीसाठी येणा-या लोकांना फार मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी असलेल्या या बंद शवदाहिन्या दुरुस्त करुन अंत्यविधीसाठी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील मरीन लाईन्स येथील चंदनवाडी स्मशानभूमीतील विद्युत शवदाहिनी गृहांच्या एकूण तीन शवदाहिनींपैकी दोन शवदाहिन्या बंद होत्या हे खरे आहे.

तथापि चंदनवाडी स्मशानभूमीतील एकूण १२ शवदाहिन्यांपैकी ९ पारंपारिक लाकडावरील शवदाहिन्या व १ विद्युतदाहिनी कार्यरत होती.

(२) बंद असलेल्या २ विद्युतदाहिन्यांपैकी १ विद्युतदाहिनीचे विद्युत आणि यांत्रिकी दुरुस्तीचे काम पूर्ण करुन दिनांक १५.०७.२०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे.

उर्वरित १ विद्युतदाहिनी मोठया दुरुत्यांकरिता बंद असून सदर विद्युतदाहिनीचे गॅस दाहिनीत रुपांतर करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथील विकल्प ट्रेड सोलूशन्स या कंपनीने जनतेची केलेली फसवणूक**

**(६०) * ९८६८ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील विकल्प ट्रेड सोलुशन्स या कंपनीने २० महिन्यात रक्कम दाम दुप्पटच्या नावाखाली शेकडो लोकांची कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चौकशी होवून जनतेस त्यांच्या ठेवी परत मिळणेबाबत लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मा. मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनीच्या मुख्य सुत्रधारांनी त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर प्रचंड मालमत्ता विकत घेतली असून शासनाने या मालमत्तेची चौकशी करुन ती जप्त करावी व ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळावी, अशीही मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, या कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत व ठेवीदारांना त्यांची रक्कम केव्हापर्यत मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रकरणी सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक येथे गु.र.नं. ३४७/१२ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ सह एमआयडीसी कायदा १९९९ कलम ३ व ४ नुसार व गु.र.नं.४६१/१२ भा.दं.वि.कलम ४२०, ४६७, ४६८, ३४ सह एमपीआयडी कायदा कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यातील ७ आरोपींना अटक करण्यात आली असून ते मा.न्यायालय नाशिक यांचे आदेशान्वये जामीनावर आहेत. एक आरोपीचे नावे असलेली स्थावर मालमत्ता व एका आरोपीच्या पत्नीच्या नावे असलेली स्थावर मालमत्ता दिनांक ०५/०३/२०१५ रोजी अधिसूचना काढून संरक्षीत करण्यात आल्या आहेत. प्रकरणी सक्षम अधिका-याची नियुक्ती करण्यात आली असून प्रकरणी पुढील कार्यवाही एमपीआयडी कायद्याच्या तरतुदीनुसार करण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबत**

**(६१) * ८३६६ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासासाठी राज्य शासनाने विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबत स्थापन केलेल्या एसआयटीने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, या हत्येप्रकरणी कोणतीही कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर गुन्ह्याच्या घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला आहे. घटनास्थळावरुन अग्नीशस्त्रामधून उडविलेल्या ५ रिकाम्या पुंगळया, रक्ताचे नमुने, जखमींच्या रक्ताच्या डागांचे व फायरिंग मार्कचे कपडे इ. जप्त करण्यात आले आहेत. जप्त मुद्देमाल बॅलेस्टिक एक्सपर्ट, मुंबई यांच्याकडे गुन्ह्याच्या अधिक तपासासाठी जमा करण्यात आला आहे. फिर्यादीसह ५० साक्षीदार तपासण्यात आले आहेत. आरोपीच्या रेखाचित्रात जाहिर प्रसिध्दी देण्यात आली आहे. जखमीचे व त्यांच्या नातेवाईकांचे कॉल डीटेल्स तसेच घटनास्थळापासून जवळच्या टॉवर आयडीवरुन झालेल्या कॉल्सचा डमडाटा प्राप्त करुन घेण्यात आला आहे. घटनास्थळाजवळील परिसराचे तसेच महामार्ग टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज मिळविण्यात आले आहेत.कॉ पानसरे यांच्या निवासस्थानाची व कार्यालयाची झडती घेण्यात आली आहे. न्यायसहाय्यक वैज्ञानिक, दहशतवाद विरोधी पथक व बी.डी.डी.एस. पथकाची मदत घेण्यात आली आहे. अभिलेखावरील गुन्हेगारांची चौकशी, जखमीचे मित्र व सहकारी यांच्याकडे तपास करण्यात आला आहे. गोपनीय बातमीदारांना सतर्क करुन त्यांची मदत घेण्यात येत आहे. सदर हत्येचा उद्देश नेमका कोणता आहे याबाबतच्या सर्व शक्यता तपासण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग नगरपरिषद (जि.रायगड) मध्ये कार्यरत असणाऱ्या**
**८ कर्मचा-यांच्या सेवा कायम करणेबाबत**

**(६२) * ९६५७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग नगरपरिषद (जि.रायगड) मध्ये गेली २२ वर्षे ८ कर्मचारी सेवेत कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यरत असलेल्या ८ कर्मचाऱ्यांची सेवा २२ वर्षे पूर्ण होवूनही अद्यापपर्यंत त्यांच्या सेवा कायम न झाल्याने त्यांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाच्या नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, २२ वर्षे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करण्याच्या प्रस्तावावरील कार्यवाहीस शासनाच्या नगरविकास विभागाकडून विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) एकूण अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या ८८ एवढी आहे.

(२) व (३) अलिबाग नगरपरिषदेतील विषयाधिन लिपीक संवर्गातील ८ कर्मचाऱ्यांची भरती विहित मार्गाने झाली नसल्याने याबाबत नगरपरिषद प्रशासन यांचेकडे दिनांक २३.१०.२००० अन्वये उक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमीतीकरणाचा प्रस्ताव करण्यात आला होता.

तथापि, नगरपरिषद संचालनालयाने उक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करता येणार नसल्याचे दिनांक ३०.०३.२०१३ अन्वये कळविले आहे.

सदर नियुक्त्या अनियमित असल्याने अलिबाग नगरपरिषदेने, औद्योगिक कलह कायदा १९४७ मधील नियम २५ फ अंतर्गत आवश्यक एका महिन्याची सेवा समाप्तीची नोटीस दिनांक २०.०६.२०१३ रोजी दिली.

सदर नोटीसीविरुध्द संबंधित कर्मचाऱ्यांने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणात शासन निर्णयाच्या अधीन राहून मा. उच्च न्यायालयाने दिनांक ११.०७.२०१३ च्या आदेशास स्थगिती दिली आहे.

-----------------

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथील खंबाटा एव्हीएशन कंपनीकडून कामगारांचे होत असलेले आर्थिक शोषण**

**(६३) * १०१६१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे विमानतळ व्यवस्थापन सांभाळणाऱ्या खंबाटा एव्हीएशन कंपनीकडून त्यांच्या २५०० कामगारांचे आर्थिक शोषण केले जात असल्याची बाब दिनांक २५ मे २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांच्या पगारातून पी.एफ, एल.आय.सी, क्रेडीट सोसायटी, यासाठी ऑगस्ट, २०१२ ते जून, २०१३ या कालावधीतील कपात केलेले करोडो रुपये संबंधित खात्यात जमा केले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांचे शोषण करणाऱ्या कंपनीविरुध्द काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कंपनीने ऑगस्ट २०१२ ते २०१३ या कालावधीत भविष्य निर्वाह निधीची कामगारांच्या पगारातून कपात केलेली एकूण १,२८,०३,३१३/- रकमेचा अपहार झाल्याबाबत खंबाटा एव्हीएशन कंपनीच्या कार्यकारी अधिकारी, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कंपनीचे संचालक व चिफ अकाऊंटंट यांचेविरुद्ध गुन्हा नोंद क्रमांक २३०/१३ कलम ४६०, ४०९, ३४ भादंविप्रमाणे एकूण पाच व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात एकूण ४,७५,००,०००/- रकमेचा अपहार निदर्शनास आला आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

सदरची अपहार केलेली रक्कम संबंधित कंपनीने भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

गुन्हा नोंद क्र.३३६/१४ कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ भादंविसं सह फीर्यादी मंगेश नाईक, नोकरी खंबाटा एव्हीएशन कंपनी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन १,५०,००,०००/- रकमेचा एल.आय.सी. कंपनीचा हप्ता जुलै २०१३ ते नोव्हेंबर २०१४ या कालावधीतील कपातीची रक्कम भरली नाही अपहार रकमेचा म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. खंबाटा कंपनीने सदरची रक्कम एल.आय.सी.मधील कर्मचा-यांच्या खात्यात जमा केली आहे. गुन्हा नोंद क्र.११५/१५ कलम ४०६, ४०९, ३४ भादंविसं फीर्यादी भविष्य निर्वाह निधी खंबाटा, एव्हीएशन कंपनीच्या माहे फेब्रुवारी, २०१४ या महिन्यातील कर्मचा-यांच्या कपातीची रक्कम रुपये ४२,२५,४१२/- चा अपहार केला म्हणून गुन्हा नोंद आहे. सदरच्या गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गांधीली (ता.जि.औरंगाबाद) येथील सहारा सिटीने ग्राहकांची केलेली फसवणुक

**(६४) * १०२०२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गांधीली (ता.जि.औरंगाबाद) शिवारातील ८२ एकर जागेवर सहारा सिटीने गृहप्रकल्प उभारण्याची घोषणा करुन ग्राहकांकडून कोटयवधी रुपये वसूल करुनही त्यांना जागेचे वाटप न करता त्यांची फसवणुक केल्याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०१५ दरम्यान प्रधान सचिव (सहकार) मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रार अर्जाप्रमाणे चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तसेच याबाबत औरंगाबाद जिल्ह्यात गुन्हा नोंद नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत बर्न सेंटर उभारण्याबाबत

**(६५) * ७१८० श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असुन वैद्यकीय सेवेसाठी रुग्ण देशाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत येत असुन अद्यापही मुंबईत बर्न सेंटर नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव माहे मे, २०१५ मध्ये काळबादेवी येथे आगीच्या इमारत दुर्घटनेत जखमी अग्निशमन जवानांना उपचारासाठी नवी मुंबईत जावे लागते वास्तविक मुंबई महानगरपालिकेने याबाबत यापूर्वीच बर्न सेंटर मुंबईत उभारण्याकरिता आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे असुनही याबाबत मुंबई महानगरपालिकेने दुर्लक्ष केल्याने आग दुर्घटनाग्रस्तांना उपचारार्थ नवी मुंबईत जावे लागते याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबईमध्ये लोकमान्य टिळक रुग्णालयामध्ये १४ खाटांचा विशेष बर्न विभाग, के.ई.एम.रुग्णालयात १२ खाटा आणि कस्तुरबा रुग्णालयात भाजलेल्या रुग्णांकरिता २५ खाटांचा विशेष कक्ष आहे.

(२) दिनांक ९ मे, २०१५ मध्ये काळबादेवी येथे इमारतीस लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत जखमी झालेल्या अधिका-यांना दुर्घटना स्थळपासून जवळ असलेल्या मसिना रुग्णालय व बॉम्बे हॉस्पिटलमध्ये तातडीच्या उपचाराकरिता हलविण्यात आले होते.

तथापि तेथील डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार या अधिका-यांना नवी मुंबई येथील नॅशनल बर्न सेंटर हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.

तसेच मुंबईमध्ये स्वतंत्र अत्याधुनिक बर्न हॉस्पिटल उभारण्याबाबतची आवश्यकता तपासून पाहण्याच्या सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक १५.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील डॉकयार्ड रोड येथे महापालिकेच्या बाजार खात्यातील कामगार वसाहतीच्या इमारत दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना नोकरी देण्याबाबत

**(६६) * ९६३३ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डॉकयार्ड रोड येथील महापालिकेच्या बाजार खात्यातील कामगार वसाहतीची इमारत सन २०१३ मध्ये कोसळून ६२ जणांचा मुत्यू झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृतांच्या वारसांना नोकरी देण्याचे आश्वासन तत्कालीन सरकारने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मृतांच्या किती वारसांना नोकरीत सामावून घेतले वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, मृतांच्या वारसांना अद्याप नोकरीत सामावून घेण्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील डॉकयार्ड रोड येथील महापालिकेची बाबू गेनू मंडई सेवानिवास्थानाची इमारत दिनांक २७.०९.२०१३ रोजी कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये ६१ जणांचा मृत्यू झाला होता हे खरे आहे.

(२) होय. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुकंपा धोरणानुसार मृतांच्या वारसांना विशेष बाब म्हणून महापालिकेत नोकरी देण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असून शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते.

(३) सदर दुर्घटनेत महानगरपालिकेचे ९ कर्मचारी व १ सेवानिवृत्त कर्मचारी मृत पावले होते. मृत कर्मचा-यांच्या वारसांस नोकरी देण्याबाबतचे एकूण १० अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झाले होते. त्यापैकी ७ प्रकरणे मंजुर झाली असून त्यापैकी ६ वारसांना महानगरपालिकेमार्फत नोकरी देण्यात आली आहे. एका प्रकरणामध्ये वारस सध्या अज्ञान असल्यामुळे त्यास महानगरपालिकेने नोकरीत सध्या सामावून घेतलेले नाही. परंतु तो जेव्हा सज्ञान होईल त्यावेळी त्याच्या शैक्षणिक अहर्तेनुसार त्यास महापालिकेमध्ये नियुक्ती दिली जाईल. अन्य ३ प्रकरणांमध्ये त्यांच्या वारसास नोकरी देणे महापालिकेच्या धोरणात बसत नसल्यामुळे त्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथे म्हाडा कॉलनीच्या पुनर्विकासासाठी**
**अडीच चटई निर्देशांक देण्याबाबत**

**(६७) * ७९७७ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड येथील समतानगर गाळेधारक महासंघाने म्हाडा कॉलनीतील सदनिकांचा पुनर्विकास करुन अडीच चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याची मागणी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान गृहनिर्माण राज्यमंत्र्यांना निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.

(२), (३) व (४) पुणे येथे म्हाडा कॉलनीच्या पुनर्विकासासाठी २.५ चटईक्षेत्र निर्देशांक यापूर्वीच देण्यात आला आहे.

येरवडा येथील म्हाडा कॉलनीजवळ हवाईदलाचे विमानतळ, सेनादलाची हद्द तसेच येरवडा येथे मध्यवर्ती कारागृह असल्याने तेथे या सर्व आस्थापनांसंदर्भात लागू असलेले इमारतींचे बांधकाम व उंचीबाबतचे निर्बंध लागू आहेत. त्यामुळे तेथील म्हाडा कॉलनीच्या पुनर्विकासास २.५ चटईक्षेत्र वापरण्यावर मर्यादा आहेत.

-----------------

## मुंबई महापालिकेच्या मल:निस्सारण विल्हेवाट प्रकल्पाबाबत

**(६८) * १०३६४ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने मल:निस्सारण विल्हेवाट प्रकल्प दोन अंतर्गत सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प हाती घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मल:निस्सारण प्रकल्प मुंबईतील कोणकोणत्या ठिकाणी उभारण्यात येणार होता,

(३) तसेच, या प्रकल्पाचा आराखडा व नियोजन करण्यासाठी सन २००५ मध्ये सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या सल्लागार कंपनीला दोन वेळा मुदतवाढ देवूनही अद्याप प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सल्लागार कंपनीवर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला होता ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) मलनिःसारण विल्हेवाट प्रकल्प-२ अंतर्गत मुंबईतील कुलाबा, वांद्रे, वरळी, वर्सोवा, मालाड, भांडुप आणि घाटकोपर या ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्रांचा विस्तार व दर्जोन्नती करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताविले आहे.

(३) या प्रकल्पाचा आराखडा व नियोजन करण्यासाठी सल्लागारांची नियुक्ती सन २००७ मध्ये करण्यात आली होती.

(४) हे अंशतः खरे आहे. सन २००७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या मॉट मॅकडोनाल्ड आणि कंसोरटियम या सल्लागारास महानगरपालिकेमार्फत सन २०१२ मध्ये एकदा मुदतवाढ देण्यात आली होती.

सदर कंत्राटाद्वारे सल्लागारांना मलजल प्रक्रिया केंद्राच्या निविदा मागविण्याच्या अनुषंगाने विविध कामे देण्यात आली होती. यापैकी ३२ कामांचे विविध अहवाल व १० कामांच्या मसुदा निविदा सल्लागारांनी एप्रिल २०१५ पर्यंत पूर्ण करून सादर केलेल्या आहेत.

प्राप्त झालेल्या अहवालानुसार मलजल प्रक्रिया केंद्रांच्या कामांच्या निविदा मागविण्याच्या प्रक्रियेस सुरूवात करण्यात आलेली आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सल्लागारांना रुपये १४१.७७ कोटी इतके अधिदान देण्यात आले आहे.

-----------------

**ठाण्यातील शिवाईनगर परिसरात अल्प गटातील कुटुंबांना**
**माफक दरात घरे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६९) * ६७७३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील शिवाईनगर परिसरात अल्प गटातील कुटुंबांना माफक दरात घरे उपलब्ध व्हावी या हेतूने म्हाडाने भागीदारी तत्त्वावर एका प्रकल्पाचा करार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारात म्हाडाने आखलेल्या धोरणाच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी एकूण अडीच चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर कराराची चौकशी करण्याचे आदेश लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महासंचालक यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार, चौकशीत दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

ठाण्यातील शिवाईनगर परिसरात अल्प गटातील कुटुंबांना माफक दरात घरे उपलब्ध व्हावी या हेतूने भागीदारी तत्वावरील प्रकल्पाचा कोणताही करार म्हाडाने केलेला नाही अथवा शिवाईनगर ठाणे येथे म्हाडामार्फत अशाप्रकारचा कोणताही प्रकल्प राबविण्यात येत नाही.

(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील महापालिकेची परिवहन सेवा कोलमडल्याबाबत**

**(७०) * ८६१२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील महापालिका प्रशासनाच्या नियोजनशुन्य कारभारामुळे आर्थिक डबघाईला आल्याने परिवहन सेवा कोलमडली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोडलेली आसने, तुटलेल्या काचा व भंगार गाडया अशी ओळख सध्या मीरा-भाईंदर पालिकेच्या परिवहन सेवेची झाली असुन यातुन प्रवास करणे प्रवाशांसाठी फार जिकरीचे झाले आहे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, मिरा-भाईंदर महानगरपालिकेची परिवहन सेवा सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर (पी.पी.पी.) समाधानकाररित्या चालू आहे. मात्र शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता, महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकडे उपलब्ध असलेल्या बसेसची संख्या कमी पडत आहे.
(२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांतर्गत ५० बसेस असून वाढत्या प्रवाशांच्या तुलनेत या बसेस कमी पडतात, हे खरे आहे.

प्रवाशांना चांगल्या दर्जाची प्रवास सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान योजनेअंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने १०० बसेस खरेदीचे कार्यादेश दिले असून या बसेस माहे सप्टेंबर/ऑक्टोबर, २०१५ अखेरपर्यंत महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत समाविष्ट होतील.

महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या वाहनतळ पायाभूत सुविधांसाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान योजनेंतर्गत रुपये ६.०० कोटी मंजूर करण्यात आले आहेत. महानगरपालिकेकडून वाहनतळ बांधण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे.

याशिवाय डेपो इन्फ्रास्ट्रक्चर व आय.टी.एस.ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महानगरपालिकेस केंद्र शासन व जागतिक बँकेकडून रुपये १०.०० कोटी मंजूर करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कर्जत (जि.रायगड) येथे दोन युवकांनी बालिकेस धमकावून**
**दोन वर्ष केलेले लैंगिक अत्याचार**

**(७१)** * *८३४३* **श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथे शस्त्राचा धाक आणि अश्लिल चित्रफीत सार्वजनिक करण्याची धमकी देवून दोन युवकांनी बालिकेवर दोन वर्ष बलात्कार करीत असल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दुस-या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शस्त्राचा धाक व अश्लिल चित्रफीत सार्वजनिक करण्याची धमकी देवून बलात्कार करणा-या नराधमावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) आरोपी नं १. याने फिर्यादी बालिकेस रिव्हॉल्वर व चॉपरचा धाक दाखवून त्याच्या कारमध्ये बसुन फिर्यादी ही अल्पवयीन आहे हे माहित असतानाही फिर्यादीस वेळोवेळी शस्त्राचा धाक दाखवून, तीच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन तसेच तीला व तीच्या नातवाईकांना जिवेठार मारण्याची धमकी देवून कारमध्ये व ब्लॉकवर तीच्या ईच्छे विरुध्द जबरी संभोग केला आहे. आरोपी नं. २ याने आरोपी नं. १ यांचे फोटो काढण्यास तसेच गुन्हयाचे कामात मदत केली आहे.

कर्जत पोलीस ठाणे I कॉ.गु.र.नं.५९/२०१५, भादंविस कलम ३७६(१)(I), ३५४ (अ)(ब)(क)(ड), ३४ सह लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ चे कलम ३,४,५,८,११,१२ भारतीय हत्यार कायदा कलम २५(१)(३) प्रमाणे दि. १०.४.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आले. आरोपींना अटक करण्यात आलेली आसून, सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मानससरोवर (भिवंडी) येथील यंत्रमाग व्यवसायिकाने विणकर कामगारांना केलेली मारहाण**

**(७२) * ८३०४ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यंत्रमाग व्यवसायात मंदी आल्याने उत्पादन कमी करण्यासाठी चालक मालकांनी यंत्रमाग माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान २० दिवस बंद ठेवले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंदमध्ये सहभागी यंत्रमाग व्यवसायिक मानससरोवर येथील महेश नसय्या बासा व गंगाराम राजमल्या बुदुल्ला यांनी टेक्सटाईल बंद न ठेवल्याने चिडलेल्या सुरेश महेसुनी व त्याच्या तिघा मित्रांनी कारखान्यामध्ये शिक्षण कामगारांना मारहाण केली व कापड ब्लेडने कापून कारखान्यातील विद्युत टयुब फोडून लाखो रुपयांचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.महेश नरसय्या बासा यांनी भिवंडी पोलीस स्टेशन मध्ये दाखल केलेल्या एफ.आय.आर.नुसार श्री.सुरेश मेहसुणी व त्याच्या मित्रांनी दिनांक ०९/०५/२०१५ रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास काही विणकर कामगारांना मारहाण करुन दोन कारखान्यात ट्युबलाईट फोडणे व ब्लेडने कापड फाडणे याद्वारे एकत्रितपणे सुमारे रुपये ८०००/- पर्यंतचे नुकसान केले आहे हे खरे आहे.

(३) या संदर्भात नमुद तक्रारीच्या अनुषंगाने भिवंडी पोलीस स्टेशनमार्फत या प्रकरणी चौकशी सुरू आहे.

-----------------

**दक्षिण मुंबईतील सर्वसामान्य नागरिकांना घर देण्याचे**
**आमिष दाखवून केलेली फसवणूक**

**(७३) * ६९५० श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील भायखळा, लालबाग, काळाचौकी येथील सर्वसामान्य नागरिकांना घर देण्याच्या बहाण्याने सुमारे २ कोटी रुपयांना फसविण्यात आल्या प्रकरणी श्री.मनीष ओझा या व्यक्तीविरोधात भायखळा व काळाचौकी पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करण्यात आल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या फसवणूकी संदर्भात चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करुन भायखळा पोलीस ठाणे गुरक्र. १८९/२०१२, कलम ४६५,४६७,४६८,४७१,४२०,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करुन गुन्ह्यात दोन व्यक्तींना अटक करण्यात आलेली असून आरोपींविरुध्द न्यायालयात दिनांक ३०.०१.२०१४ रोजी दोषारोपत्र पाठविण्यात आलेले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडवरील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत

**(७४) * ७२३५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोड वरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कुर्ला स्टेशनचे उजवीकडील वळण वाहतूक पोलीसांनी अनधिकृतपणे बंद केल्यामुळे सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलामुळे चेंबूर ते कुर्ला हे अंतर पार करण्यासाठी केवळ ५ मिनीट लागत आहे व सदर रस्त्यावर कार्यालयीन वेळेत १ ते २ तास वाहतूक कोंडी असते याकरीता पालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी वाहतूक पोलीसांच्या मदतीने प्रश्न भाग १ चा मार्ग निवडल्याने कुर्ला स्टेशन मार्गावरील पालिका कार्यालय, शाळा आणि अन्य ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना १ ते २ कि.मी. वळसा घालुन जावे लागत आहे. या ठिकाणचा रस्ता रहदारीसाठी अयोग्य असून वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुर्ला स्टेशनचे उजवीकडील वळण वाहतूक पोलीसांनी अनधिकृतपणे बंद केलेला मार्ग चालू करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सांताक्रुज-चेंबुर लिंक रोड हा पूर्व द्रुतगती मार्ग व पश्चिम द्रुतगती मार्गास जोडणारा प्रमुख मार्ग असल्याने या मार्गावर वाहतुकीचे प्रमाण जास्त आहे. या मार्गावरील विविध जंक्शनवर होणारी वाहतूक कोंडी सोडविण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी हलवा पूल जंक्शन (हनुमान मंदीर जंक्शन) येथून कुर्ला स्टेशनकडे जाणारे वळण बंद करण्यात आले.

या मार्गावरील हलक्या व जलवाहनांना कुर्ला स्टेशनकडे जाण्याकरिता सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोड वरील दोन स्वतंत्र अंडरपासमधून “यु” टर्न घेऊन हनुमान जंक्शन येथून डावीकडे वळता येणार आहे. शिवाय पादचाऱ्यांच्या सुरक्षितता व सोईकरिता रस्ता ओलांडण्यासाठी नवीन पादचारी पूल उभारण्यात आलेला आहे. या सुविधेमुळे या मार्गावरील बुध्द विहार, हनुमान जंक्शन येथील वाहतूक कोंडी समस्येचे निरसन झाले असून वाहतूक सुरळीत चालू आहे. सदर उजवे वळण पुन्हा चालू करणे योग्य ठरणार नाही.

-----------------------------

**मुंबईत बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे म्हाडाची १८०० घरे मिळविलेल्या दलांलावर कारवाई करण्याबाबत**

**(७५) * ७६६० प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४५४७ ला दिनांक ४ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे म्हाडाची १८०० घरे मिळविलेल्या दलांलावर म्हाडाकडून कोणतीही कार्यवाही होत नसून याबाबत चार महिन्यापूर्वी चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतरही अद्यापर्यंत चौकशी समिती स्थापन केली नसल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी समिती स्थापन न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त समिती केव्हापर्यंत स्थापन करण्यात येणार आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) हे खरे नाही.

म्हाडामार्फत परवडणा-या घरांच्या सन २०१० ते २०१२ पर्यंत एकूण ८३५० सदनिकांची जाहीरातीद्वारे वितरणाची प्रक्रीया करण्यात आलेली आहे. त्यापैकी विविध जात प्रवर्गाकरिता १६७१ सदनिका राखीव ठेवण्यात आल्या होत्या. सदरहू सदनिकांच्या वितरण प्रक्रियेत अर्जदारांची पात्रता निश्चिती करताना एकूण ५ अर्जदारांनी खोटी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने याअनुषंगाने संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांना त्यांच्या प्रमाणपत्राचा गैरवापर केल्याप्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्यास म्हाडाकडून कळविण्यांत आले आहे. तसेच संबंधितांविरुद्ध म्हाडा स्तरावरुन गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.

तसेच २०१० ते २०१२ पर्यंतच्या सदनिका वितरणापर्यंत जात प्रमाणपत्राचा गैरवापर झाला आहे किंवा कसे याची सविस्तर तपासणी करण्याकरिता म्हाडा स्तरावर चौकशी समिती स्थापन करण्यांत आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रात्रपाळीत काम करण्यास महिलांना परवानगी देण्याचा घेतलेला निर्णय

**(७६) * ८२२१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारखाने कायद्याखाली येणाऱ्या उद्योगांमध्ये महिला कामगारांना सुरक्षेच्या हमीसह रात्रपाळीत काम करण्याची परवानगी देणारा कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये दुरुस्ती करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने माहे मे, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयासंबंधात महिला संघटनांशी विचार विनिमय करण्यात आला होता काय,

(३) रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेची कोणती व्यवस्था शासनाने केली आहे,

(४) कामाच्या ठिकाणी महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह असण्याचे बंधनकारक करण्याचा नियम शासन करणार आहे काय,

(५) संबंधीत क्षेत्रातील पोलीस स्टेशनवर पुरुष व महिला कामगारांच्या माहितीच्या रेकॉर्डची नोंद बंधनकारक करणार आहे काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) कारखाने अधिनियम, १९४८ मधील काही कलमांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने दिनांक २० मे, २०१५ रोजी घेतला आहे. अशी वस्तुस्थिती आहे.

(२) कारखाने अधिनियम, १९४८ मधील कलम ६६ (१) (ब) नुसार महिला कर्मचाऱ्यांना रात्रपाळीत काम करण्यास प्रतिबंध असून राज्य घटनेतील समानतेच्या तत्वाच्या आधारे या कलमातील तरतूदी मद्रास उच्च न्यायालयाने घटनाबाहय ठरविल्या आहेत. याच आशयाची याचिका (क्र. ११११११/२०१४) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथेही न्यायप्रविष्ट आहे.

मा.न्यायालाचे या संदर्भातील निर्देश तसेच महिला कर्मचाऱ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी तसेच, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन त्यांना सबला करण्याचा राज्य शासनाचा मानस असल्याने या संदर्भातील निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) महिलांना रात्रपाळीमध्ये काम करण्यास मुभा देण्याचा मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करताना महिलांच्या सुरक्षेबाबतच्या व्यवस्थेसंदर्भात विचार करण्यात आला असून त्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करणे संबंधित कारखाना व्यवस्थापनावर बंधनकारक करण्यात येणार असून त्याबाबतचा तपशील स्वतंत्र अनूसूचीत विहीत करण्यात येणार आहे.
(४) महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ अंतर्गत कारखान्यामध्ये महिलाकरीता स्वंतत्र स्वच्छतागृह ठेवण्यात यावीत, अशी तरतूद आहे.
(५) कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करुन तो राज्यात लागू झाल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये पुरुष व महिला कामगारांच्या माहीतीचा तपशील पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही पोलीस विभागाकडून करण्यात येईल.

-----------------

**राज्यात लोकायुक्त व उपलोकायुक्त पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याबाबत**

**(७७) * ७५५० अ‍ॅड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३६७२ ला दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लोकायुक्त व उपलोकायुक्त ही दोन अत्यंत महत्वाची असलेली पदे माहे जुलै, २०१४ पासून रिक्त असल्याचे दिनांक १४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या लोकायुक्त व उप लोकायुक्त यांच्या अनुपस्थितीत कार्यालयीन रजिस्ट्रार हे कामकाज पाहत असून ते दिनांक ४ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवृत्त होणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकायुक्त कार्यालयात दररोज सरासरी ३० तक्रारी दाखल होत असल्याने गेल्या १० महिन्यांत प्राप्त झालेल्या तक्रारी प्रलंबित असल्याचेही माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्यादृष्टीने लोकायुक्त व उपलोकायुक्त या पदावर नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, मा.लोक आयुक्त हे पद दिनांक ३ जुलै, २०१४ तसेच उप लोक आयुक्त हे पद दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून रिक्त आहे, हे खरे आहे,
(२) लोक आयुक्त कार्यालयातील प्रबंधक हे दिनांक ०३.०२.२००९ रोजी नियतवयोमानानुसार सेवा निवृत्त झाले होते. त्यानंतर त्यांना लोक आयुक्त यांचे कार्यालयाकडून दिनांक ४.२.२००९ ते दिनांक ३.६.२०१५ या कालावधीकरिता वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रबंधक पदावरील कार्यकाल दिनांक ३.६.२०१५ रोजी संपुष्टात आला आहे.
(३) दिनांक ३०/६/२०१५ अखेर लोक आयुक्त कार्यालयाने एकूण ४१२६ इतकी प्रकरणे प्रलंबित असल्याचे कळविले आहे.
(४) मा. लोकायुक्त व उप लोकायुक्त ही पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील हमालांना पेन्शन देण्याच्या मागणीबाबत**

**(७८) * ८४२६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील हमालांनाही पेन्शन देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य हमाल-माथाडी महामंडळाने पंढरपूर येथे माहे मार्च २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही. तथापि, सदरहू संघटनेने पेन्शनसह विविध मागण्यांसदर्भात शासनास दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी निवेदन दिले असल्याचे आढळून येत आहे.
(२) सदर निवेदनातील मागण्यांबाबत शासन स्तरावरुन तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील रुग्णालयावर**
**प्रशासनाचे नियंत्रण नसल्याबाबत**

**(७९) * ८८७७ श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील रुग्णालयात सन २००१ पासून दरवर्षी १ हजाराहून अधिक रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहर व आसपासच्या परिसरातील गरीब रुग्ण ठाण्यातील कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी येतात परंतू मागील काही वर्षापासून या रुग्णालयावर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण राहिले नसल्याने रुग्णांना तपासणीकरीता खाजगी तपासणी केंद्रात जावे लागत आहे, तरी सदरहू रुग्णालयातील कारभाराची व रुग्णांच्या होणाऱ्या वाढत्या मृत्यूच्या संख्येची शासन चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) रुग्णालयाच्या वार्षिक सांख्यिकीपत्रानुसार सन २००१ ते सन २०१४ या कालावधीत सरासरी वार्षिक ९९५ मृत्यू झाले आहेत.

(२) सन २०१४ मध्ये वा रुग्णालयात भरती होणाऱ्या रुग्णांची संख्या सन २००१ च्या तुलनेत सुमारे दीड पट झाली असून वैद्यकीय तज्ञ व आवश्यक सोयीसुविधांच्या पार्श्वभूमीवर मृत्यूचे प्रमाणे ४.९१% वरुन ३.४५% एवढे झाले आहे. भविष्यातदेखील यामध्ये महानगरपालिकेतर्फे सुधारणा करण्याची कार्यवाही निरंतर सुरु राहणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड शहरातील महापालिकेच्या विसावा उद्यानाची झालेली दुरवस्था**

**(८०) * ८९४८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या महापालिकेच्या विसावा उद्यानाची दुरवस्था झाली असून हे उद्यान नागरीकांसाठी गैरसोयीचे असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उद्यानाच्या सौंदर्यीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) (i) उद्यानाचे विस्तारीकरण व सौंदर्यीकरणासाठी नांदेड महानगरपालिकेने एकूण रुपये १०.०२ कोटीचा आराखडा तयार केला आहे.
(ii) शासनाच्या पर्यटन विभागाने 'प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत' रुपये ३.५२ कोटीच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान केली असून नांदेड महापालिकेने दिनांक ०६/०५/२०१४ रोजी उद्यानाच्या विकास कामाकरिता कार्यारंभ आदेश काढले आहेत.
(iii) प्राप्त निधीमधून उद्यानामध्ये फुड प्लाझा, स्वतंत्र शौचालय, वाहनतळ, जॉगीग ट्रॅक, परगोला, पाथवेज व लॅन्ड स्केपींगची कामे हाती घेण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनातील कर्मचाऱ्यांसाठी हौसिंग फंड उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

**(८१) * ९२५९ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनातील कर्मचारी यांचे घरांच्या किंमती आवाक्यात याव्यात यासाठी भविष्य निर्वाह निधीच्या धर्तीवर हौसिंग फंड उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास केव्हा,
(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) राज्यातील अत्पल्प/अल्प/मध्यम उत्पन्न प्रवर्गाकरिता म्हाडातर्फे 'स्वयंसहाय्यित गृहनिर्माण निधी योजना' राबविण्याचे यशदामार्फत तयार करण्यात आलेल्या गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ च्या मसुद्यात प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार 'या स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात येणाऱ्या निधीत कोणताही स्वयंरोजगार करणारी किंवा शासकीय किंवा

खाजगी कर्मचारी असलेली व्यक्ती सभासद होऊ शकेल. ही व्यक्ती आपल्या उत्पन्नापैकी निश्चित रकमेचे मासिक अंशदान करेल. या गृहनिर्माण निधीचे व्यवस्थापन या क्षेत्रातील निष्णात संस्थेमार्फत केले जाईल. गृहनिर्माण निधीतील सभासदांची आकडेवारी निश्चित ठिकाणांसह घरांची गरज दर्शविणारी असेल. गृहनिर्माण निधीत १० वर्षे अंशदान केल्यानंतर सदर कर्मचारी शासनाच्या घरकुल योजनांमध्ये अर्ज करु शकेल. अर्जाच्या वेळी त्याच्या खात्यावर जमा असलेला निधी हा घरांच्या किंमतीमध्ये त्याचा सहभाग समजला जाईल व तो उर्वरित रक्कम कर्जरुपाने उभारु शकेल. त्यामुळे लोकांना घरांसाठी बचत करण्यासाठी प्रोत्साहन मिळून काही प्रमाणात गृहनिर्माणासाठी वित्त पुरवठा शक्य होईल. गृहकर्जाच्या वजावटीसंदर्भात आयकर विभागाकडून देण्यात आलेल्या सवलती गृहनिर्माण निधीमध्ये देण्यात आलेल्या वर्गणीसही लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करेल. या योजनेमधील सदस्यत्व घेणा-यास म्हाडा त्यांच्या सदनिका वाटपाच्या सोडतीत प्राधान्य देईल. या करिता म्हाडा अधिनियम/विनियम नियमावलीत आवश्यकतेनुसार सुधारणा केली जाईल. सदर योजना ९० दिवसांच्या आत अधिसूचित करण्यात येईल.

गृहनिर्माण धोरणाच्या मसुद्याच्या प्रती सर्व केंद्रीय व राज्य मंत्रीमंडळातील मंत्री, राज्यातील सर्व संसद सदस्य व विधानमंडळ सदस्य तसेच प्रशासकीय विभागांना सूचना व अभिप्रायार्थ पाठविण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून सदर मसुद्यासंबंधी प्राप्त सूचना/अभिप्राय विचारात घेऊन याप्रकरणी पुढील निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. या कंपनीच्या कामगारांची कोटयवधीची देणी प्रलंबित असल्याबाबत**

**(८२) * ९३४७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ४८२८ ला दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. या कंपनीमध्ये टाळेबंदी दाखवून येथील कामगारांची कोट्यवधीची देणी प्रलंबित असूनही कंपनीची शेकडो एकर जमीन विकासकाला विकून कमर्शिअल व निवासी सदनिकांचे टॉवर उभारण्याचा कंपनी व्यवस्थापनाचा डाव असल्याची गंभीर बाब माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मे. एन.आर.सी.लि. मोहने च्या कंपनी व्यवस्थापनाने बिकट आर्थिक परिस्थितीमुळे कंपनीच्या ताब्यातील ३३९ एकर इतकी जमीन मे. रहेजा युनिर्व्हसल प्रा.लि. यांना विकण्याचा करार (MOU) दि. १/०३/२००७ रोजी केला आहे. तर दि. १५/११/२००९ पासून करखान्यात टाळेबंदी लागू केली आहे व कामगारांची रु. ८२.४७ कोटी इतकी देणी प्रलंबित आहेत हे खरे आहे.
(२) व (३) होय.

दि.१६/७/२००९ रोजी बीआयएफआरने सदर उद्योग आजारी म्हणून घोषित केला आहे. विविध विषयावर प्रकरणे मा. उच्च न्यायलय मुंबई तथा मा. सर्वोच्च न्यायालय मुंबई येथे सध्या बँकेत जमा असलेले रु. २४.५० कोटी कामगारांना वाटप करण्यासाठी याचिका दाखल केली असून सदर याचिका प्रलंबित आहे. कामगारांची थकीत देणी अदा करण्याच्या दृष्टीने शासनाच्या विविध स्तरावर बैठका आयोजित करुन कामगारांच्या देय रकमा देण्याबाबत प्रयत्न केलेले आहेत. क्षेत्रिय कामगार कार्यालयाने व्यवस्थापनाविरुध्द किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत फौजदारी खटले दाखल केले होते. त्यामध्ये व्यवस्थापनास रु. ६०० दंड झाला. ५२८ कामगारांचे अर्ज Early Retirement Sheme अंतर्गत व्यवस्थापनाकडून मंजूरीसाठी प्रलंबित आहेत.

-----------------

## पालघर नगरपरिषद प्रारुप विकास आराखडा रद्द करण्याबाबत

**(८३) * १०७९७ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ४६३३ ला दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर विकास आराखडयात स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड विरोध व तक्रारी असल्यामुळे हा आराखडा रद्द करण्याची मागणी स्थानिक प्रतिनिधीनी दिनांक ९ जुन, २०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे,

(३) निर्णय घेतला असल्यास, नव्याने आराखडा बनविण्याची प्रक्रिया किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) मा. लोकप्रतिनिधी यांनी निवेदनामध्ये नमुद केलेले मुद्दे तपासण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील १८-२० वर्षे वयोगटातील २४४ मुले बेपत्ता झाल्याबाबत

**(८४) * ९८०२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील १८-२० वर्षे वयोगटातील २४४ मुले बेपत्ता होवून त्यापैकी २०८ मुलाचा शोध लागला असून अद्यापही ३६ मुले मिळाले नसल्याचे दिनांक १८ मे, २०१५ ला निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बेपत्ता मुलाचा शोध घेण्यासंबंधी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
चंद्रपूर जिल्ह्यात १८-२० वयोगटातील एकुण ९९ मुले बेपत्ता झाली होती. त्यातील ७८ मुलांचा शोध लागला असून २१ मुले मिळालेली नाहीत.
(२) चंद्रपूर जिल्ह्यात बेपत्ता मुलांचा शोध घेण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन पातळीवर पथके तयार करण्यात आली असून सदरचे बेपत्ता मुलांच्या पालकांशी संपर्क साधून सदर मुले कोणत्या कारणास्तव बेपत्ता झाली आहेत याची संपुर्ण माहिती घेतली जाते.
मुले बेपत्ता झाल्याची तक्रार प्राप्त होताच त्या मुलांविषयी संपुर्ण माहिती तात्काळ www.trackthemissingchild.gov.in तसेच mahapolice.gov.in या वेबसाइटवर लोड केली जाते व त्यांचा शोध लागल्यास किंवा त्याबाबतची माहिती मिळाल्यास ती कळविण्याविषयी विनंती करण्यात येते.

चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक ०१ जुलै, २०१५ पासून बेपत्ता झालेल्या परंतु अद्यापपर्यंत त्यांचा ठावठिकाणा न लागलेल्या मुलांबाबत ऑपरेशन मुस्कान ही विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. यामध्ये प्रत्येक पोलीस स्टेशन पातळीवर १ पोलीस अधिकारी तसेच २ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर मुलांचा शोध घेण्यात येतो. यामध्ये १८.२० वयोगटातील बेपत्ता झालेल्या ४ मुलांचा शोध लागला आहे व इतर मुलांचा शोध घेण्याचे काम कसोशीने चालु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) गैरप्रकारांना आळा घालणेबाबत**

**(८५) * ७८१४ श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी तालुक्यात (जि.सिंधुदूर्ग) दारु, मटका, जुगार इत्यादी अवैध प्रकार वाढलेले असतानाच महिला व मुलींच्या छेडछाडीचे प्रकार वाढल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणती कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) एप्रिल, २०१५ पर्यंत दारूबंदी व जुगार सदराखाली एकूण ८ केसेस दाखल झाल्या आहेत. एप्रिल, २०१५ पर्यंत विनयभंग सदराखाली एकूण २ केसेस दाखल झाल्या आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी जुगार सदराखाली गु.र.क्र. ३००१/२०१५, ३००२/२०१५, ३००६/२०१५ मुंबई जुगार अधिनियमाच्या कलम १२(अ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गुन्ह्यांमध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्याकडून रु. २,६७०/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

दारुबंदी सदराखाली गु.र.क्र. ६००१/२०१५, ६००२/२०१५, ६००३/२०१५, ६००४/२०१५, ६००५/२०१५ मु.प्रो. अधिनियमाच्या कलम १२(अ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गुन्ह्यांमध्ये १३ आरोपींना अटक करण्यात आले असून १०८ लिटर दारु व वाहने मिळून रु. १२,३०,०००/- मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

महिला छेडछाड सदराखाली गु.र.क्र. १४/२०१५ भां.दं.वि कलम ३५४(अ) व गु.र.क्र. २६/२०१५ भां.दं.वि. कलम ३५४(ड) (१) (३) , ३२३, ५०४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सावंतवाडी तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरिता अवैध धंदे समूळ नष्ट करण्याचे दृष्टीने तसेच छेडछाड होऊ नये याकरिता प्रतिबंधक कारवाई म्हणून सावंतवाडी शहरात महत्वाचे ठिकाणी तसेच गर्दीची ठिकाणी पोलीस फिक्स पॉईंट तसेच शहरात व इतर पोलिस ठाणे कार्यक्षेत्रात दिवसा तसेच रात्रौ सक्त गस्त करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील मानपाडा पोलीस ठाणे हद्दीतील इंद्रप्रस्थ बारमधील बारबालांसमवेत पोलीसांनी आक्षेपार्ह वर्तन केल्याबाबत

**(८६) * ७८२८ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मानपाडा पोलीस ठाणे हद्दीतील इंद्रप्रस्थ नावाच्या बारमधील बारबालांसमवेत आक्षेपार्ह वर्तन करताना दोन पोलीस कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान रंगेहाथ पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारमधील बारबालांसमवेत आक्षेपार्ह वर्तन करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कारवाई केली नसल्यास त्याची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,
(२) प्रकरणी मानपाडा पोलीस स्टेशन गुरक्र. १६/२०१५ भादंविस कलम २९४,३४ सह मु.पो.का. कलम ३३ (डब्ल्यु), १३१ प्रमाणे दिनांक १२.०४.२०१५ रोजी गुन्हा दाखल करणेत आला आहे. सदर गुन्ह्यात एकुण २४ आरोपीतांना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे. तसेच सदर पोलीस कर्मचाऱ्यांना दिनांक १७.०४.२०१५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. सदरचे कर्मचारी हे सध्या निलंबित आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील साखर कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांची माथाडी मंडळामध्ये नोंद करण्याबाबत**

**(८७) * ७७७६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १३० सहकारी साखर कारखाने व ४० खाजगी असे एकूण १७० साखर कारखाने असून तेथे काम करणारे २० हजार माथाडी कामगार माथाडी मंडळामध्ये नोंदित नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच कामगार न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने ४ वर्षापूर्वी साखर कारखान्यातील माथाडी कामगारांना माथाडी मंडळामध्ये नोंदित करण्याचे आदेश कारखानदारांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय काढळून आले व तद्नुसार माथाडी कामगारांना न्याय मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. तथापि, कृष्णा सहकारी साखर कारखाना, ता.कराड, जि.सातारा मुख्य मालक म्हणून नोंदित न झाल्याने मा. कामगार न्यायालयात त्यांचेविरुध्द खटला दाखल केला होता. सदर खटल्यात मा. कामगार न्यायालयाने कारखाना व्यवस्थापनास दोषी मानण्यात येऊन रु. ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद अशी शिक्षा ठोठावली होती. सदर निर्णयाविरोधात कारखाना व्यवस्थापनाने मा. औद्योगिक न्यायालय, मा. उच्च न्यायालय तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात टप्प्याटप्प्याने दाद मागितली होती. सदर तिनही न्यायालयांनी कृष्णा सहकारी साखर कारखान्याची विनंती फेटाळली आहे.

(३) (४) व (५) कृष्णा सहकारी साखर कारखाना, ता. कराड जि.सातारा यांनी त्यांना माथाडी अधिनियम लागू होत नसल्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. २२८६/१९९६ दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि. ११/९/२००२ रोजी झालेल्या सुनावणीत कारखान्यास माथाडी अधिनियम लागू होतो किंवा कसे याचा निर्णय दोन महिन्यात घेण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार सदरहू विषय सल्लागार समितीच्या दि. ४/११/२००३ रोजीच्या बैठकीत ठेवला असता याप्रकरणी साखर आयुक्त, पुणे व अपर कामगार आयुक्त, पुणे यांनी बैठक घेऊन निर्णय घेण्याबाबत ठरले. सल्लागार समितीत ठरल्यानुसार अपर कामगार आयुक्त, पुणे व साखर आयुक्त यांच्या दि. १७/५/२००५ रोजी झालेल्या बैठकीत अंतिम निर्णय शासनाच्या वरिष्ठ पातळीवर घेण्याच्या अधीन राहुन कारखान्यास मुंबई औद्योगिक अधिनियम, १९४६ किंवा माथाडी अधिनियम, १९६९ च्या सवलती देण्यात याव्यात असे ठरले. त्यानंतर सदरहू विषय सल्लागार समितीच्या दि. १७/१/२००६ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला असता उक्त विषय राज्यमंत्रीमंडळासमोर ठेवून निर्णय घ्यावा असे समितीच्या अध्यक्षांनी सांगितले होते. त्यानुसार सदरहू विषय सल्लागार समितीच्या दि. १७/९/२००६ रोजीच्या बैठकीत फेरविचारार्थ ठेवण्यात आला होता. तथापि त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील सफाई कामगारांना साबण, गमबूट, हातमोजे, मास्क अशा सुविधा न पुरविता त्यांना मलविसर्जनयुक्त पाण्यात काम करण्यास भाग पाडल्याबाबत

**(८८) * १०९९ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सफाई कामगारांना साबण, गमबूट, हातमोजे, मास्क अशा सुविधा न पुरविता त्यांना मलविसर्जनयुक्त पाण्यात काम करणास भाग पाडल्याप्रकरणी महापालिकेचे तत्कालीन भांडारप्रमुख व सध्याचे विद्युत अधीक्षक, प्रकल्प प्रमुख, ठेकेदार यांच्याविरुध्द कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती दोषी आढळून येणा-या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी अधिक्षक अभियंता (विद्युत), पुणे महानगरपालिका, ठेकेदार मे, महाबळ एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.व एम.एल.डी.भैरोबा पंपिग स्टेशन कोरेगांव पार्क, पुणे येथील फ्लॅट प्रमुख यांच्याविरुद्ध कोरेगांव पार्क पोलीस स्टेशन येथे दिनांक १० मे, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी कोरेगांव पार्क पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३००९/२०१५, The Prohibition of Employment as Manual Scavengers and their Rehabilitation Act २०१३ चे कलम ८ व ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील पवना बंद नळ योजनेचे काम पूर्ण करणेबाबत**

**(८९) * १०६२५ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथे रावेतच्या वर असणाऱ्या भागातून नाल्यातील पाणी थेट नदीत मिसळत असल्यामुळे शहराला दूषित पाणीपुरवठा होत असल्याने तेथील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवना बंद नळयोजना सुरु झाली नाही तर भविष्यात शहराला नाल्यातील प्रदूषित झालेले पाणी प्यावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पवना बंद नळ योजनेचे काम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे. पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथे रावेतच्या वर असणा-या भागातून नाल्यातील पाणी थेट नदीत मिसळत असले तरी नदीतील पाणी रावेत येथील बांधा-यातून विद्युत पंपाद्वारे उचलून पंपिंग करुन निगडी जलशुद्धीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया करुन, पिण्यास योग्य करुन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुरविले जाते आहे.

(२) हे खरे नाही. नदीतील पाण्यावर प्रक्रिया करुनच ते पिण्यायोग्य (Potable) करुन शहरातील नागरीकांना पिंपरी-चिंचवड महानगरपालिके मार्फत वितरीत केले जाते.

(३) व (४) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत मंजूर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पवना धरणापासून निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्र पाणी पुरवठा प्रकल्पाच्या विरोधात झालेल्या आंदोलनात उद्भवलेल्या गंभीर कायदा व सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी पुणे यांनी प्रकल्पाच्या कामास स्थगिती दिलेली होती. त्याअनुषंगाने प्रकल्पाच्या कामास दिलेली स्थगिती उठविण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

----------------

**मुंबईतील भाभा रुग्णालय, शताब्दी रुग्णालय व राजावाडी रुग्णालय येथे सीटी स्कॅन तसेच एमआरआय स्कॅन सुविधा उपलब्ध करणेबाबत**

**(९०) * ८९८६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला भाभा रुग्णालय, कुर्ला व पंडीत मदनमोहन मालवीय (गोवंडी शताब्दी) या रुग्णालयात सीटी स्कॅन तर घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात एमआरआय स्कॅनची सुविधा नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात सीटी स्कॅन व एमआरआय स्कॅन या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कुर्ला भाभा रुग्णालय येथे सी.टी.स्कॅन सुविधा व राजावाडी रुग्णालय येथे एम.आय.आर.सुविधा चालू करण्याबाबत महानगरपालिकेच्या सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्प अंतर्गत कार्यवाही चालू आहे. त्यामधील लघुत्तम देकाराने अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे त्याच अटी व शर्तीवर दुस-या लघुत्तम देकारास कंत्राट देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

पं.मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालय, गोवंडी येथे महापालिकेतर्फे सिटी स्कॅन मशीन बसविण्यासाठी जागा निश्चित केलेली आहे. तसेच निविदा प्रक्रिया झाली असून मसुदापत्र सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

## मुंबई महापालिका प्रशासनाने सन २००० नंतरच्या अनधिकृत झोपडपटयांना जादा दराने पाणी देण्याचा घेतलेला निर्णय

**(९१) * ७३६९ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई महापालिका प्रशासनाने सन २००० नंतरच्या अनधिकृत झोपडपट्ट्यांना जादा दराने पाणी देण्यासाठी धोरण आखले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईची सध्याची लोकसंख्येची स्थिती पाहता सध्या वास्तव करित असलेल्या लोकांनाही पाण्याची कमतरता भासत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढीव झोपडपटयांसाठी देण्यात येणाऱ्या पाण्यासाठी शासनाने कोणती वाढीव पाण्याची उपाययोजना केली आहे,

(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठ्यात वाढ करण्यासाठी नवीन प्रकल्प प्रस्तावित आहेत. तसेच झोपडपट्ट्यांमधील रहिवाशी सध्याच्या पाणी पुरवठ्यामधूनच अनधिकृतपणे पाण्याचा वापर करीत असतात. त्यामुळे या अनधिकृत झोपडपट्टीवासीयांना अधिकृतपणे पाणी दिल्यास वाढीव पाण्याची गरज भासणार नाही.

-----------------

## पुणे महापालिकेने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास इमारतींचे विकसन शुल्क तसेच मिळकत कर भरण्यासंदर्भात नोटीस पाठविल्याबाबत

**(९२) * ७०५० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास ९९९ वर्षासाठी एक रुपया या दराने शासनाने जागा दिलेली असून विद्यापीठ आवारातील अकरा इमारतींचे विकसन शुल्क तसेच मिळकत कर मिळून सुमारे ४२ कोटी रुपये भरण्याबाबत पुणे महानगरपालिकेने विदयापीठाला नोटीस पाठविली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायदयानुसार विदयापीठास सर्व सवलती मिळणे आवश्यक आहे व नगररचना कायदयानुसार शासकीय संस्थाकडून विकसन शुल्क घेणे बंधनकारक नाही व त्यामुळे सदर कर अवाजवी असल्याचे विदयापीठाचे म्हणणे असून तसे विदयापीठाने महानगरपालिकेस पत्राद्वारे कळवून सदर कर भरण्यास नकार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती काय आहे व शासनाकडून याप्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. सदर मिळकत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास ९९९ वर्ष, भाडे दरसाल रुपये १/- याप्रमाणे लीजवर दिली आहे.

विद्यापीठाच्या आवारातील इमारतीच्या बांधकामाबाबत जमीन विकास शुल्क व बांधकाम विकास शुल्कापोटी सुमारे रुपये ४२.५८ कोटी अदा करणेबाबत विद्यापीठास एप्रिल, २०१५ मध्ये लेखी कळविण्यात आले आहे.
(२) अशा आशयाचे दिनांक ३०.६.२०१५ चे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.
(३) विद्यापीठाच्या बांधकाम शुल्काबाबत महानगरपालिकेने विधी सल्लागारांचा सल्ला घेतला आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ही संविधनिक व स्वायत्त संस्था असून सदर जागेवर व बांधकामावर विद्यापीठाचेच नियंत्रण असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ एफ (१) नुसार विद्यापीठास कोणतीही सवलत लागू होत नाही. परिणामी, विद्यापीठास विकास शुल्क भरणेबाबत दिनांक १८.४.२०१५ व दिनांक २९.४.२०१५ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ एफ (२) नुसार शैक्षणीक वापराकरिता सवलत देण्यात येते. महानगरपालिकेच्या आदेशाविरुध्द अर्जदार संस्थेने शासनाकडे या अधिनियमाचे कलम १२४ (जी) नुसार अपील दाखल केल्यास शासनास त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेता येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील अंधेरी येथील न्यू म्हाडा कॉलनीत अभिनेत्री शिखा जोशी हिने राहत्या घरी गळयावर चाकूने वार करुन आत्महत्या केल्याबाबत**

**(९३) * ६७४८ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी येथील न्यू म्हाडा कॉलनीत ४० वर्षाच्या शिखा जोशी या अभिनेत्रीने मानसिक तणावात तिच्याच मैत्रिणीच्या राहत्या घरी गळयावर चाकूने वार करुन आत्महत्या केल्याची घटना दिनांक १७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आत्महत्या प्रकरणाची वर्सोवा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार पुढे काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय, सदर बाबत वर्सोवा पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यू नोंद क्रमांक ३५/१५ कलम १७४ मुंबई अपमृत्यू नोंद घेण्यात आली आहे.
(३) व (४) नमूद चौकशी मध्ये मयत शिखा जोशी हिने तिच्या मैत्रिणीच्या घरी बाथरुम मध्ये स्वत: गळया भोवती जखम करुन घेतल्याने तिच्या मृत्यू झाला आहे. सदर बाबत तिच्या मृत देहाचे शवविच्छेदन मा. वैद्यकीय अधिकारी, कुपर रुग्णालय, मुंबई यांनी केले असून तिच्या मृत्यूचे कारण shock due to cut Throat Injury असे नमूद केले आहे. सदर प्रकरणी अधिक चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा शहरासाठी अर्बन इन्फास्ट्रक्चर डेव्हलपमेंट योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(९४) * ७९३८ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा शहरासाठी अर्बन इन्फास्ट्रक्चर डेव्हलपमेंट स्किम ही केंद्र शासनाच्या योजनेतून राबविण्यात आलेल्या वाढीव नळपाणी पुरवठा योजना ८ कोटी रुपयांची असताना अकार्यक्षम कारभारामुळे अपूर्ण आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर योजना तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएमटी उपअभियाना अंतर्गत मंजूर रुपये ७.९६ कोटी किंमतीचा मंगळवेढा पाणीपुरवठा प्रकल्प पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे.
(२), (३) व (४) तथापि सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने पाहणी करुन अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**मालवणी (मुंबई) येथील पोलीस ठाण्यात चोरीच्या तपासासाठी ताब्यात घेतलेल्या आरोपीचा तुरुंगात झालेला मृत्यू**

**(९५) * ९११९ श्री.हेमंत टकले, श्री.अनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती स्मिता वाघ, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मालवणी येथे चोरीच्या तपासासाठी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचा मालवणी पोलीस ठाण्याच्या लॉकअप मध्ये मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी चालु आहे.

-----------------

**सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाद्वारे चालविण्यात येणाऱ्या बसेसचे परिक्षेत्र वाढवून देण्याबाबत**

**(९६) * ८७३१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या जे.एन.यु.आर.एम.या योजनेंतर्गत सोलापूर मनपाच्या परिवहन उपक्रमास २०० बसेस उपलब्ध झाल्या असून त्यातील १५० बसेस सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात सामील ही झाल्या आहेत, यामुळे सरासरी २४५ बसेस मार्गावर धावणार असून यासाठी २० कि.मी. परिघ क्षेत्र वाढवून घेऊन ४० कि.मी चे क्षेत्र मंजूरीसाठी मा.मुख्यमंत्री व मा.परिवहन मंत्री यांना लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बससेवा ४० कि.मी परिघक्षेत्रात सुरु करण्याबात शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) याबाबतचा प्रस्ताव सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन व्यवस्थापनाने दिनांक ३०/६/२०१५ रोजी शासनास पाठविला आहे. सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे. त्याबाबत सत्वर निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे झालेल्या बहुचर्चित के.बी.सी. घोटाळयापाठोपाठ मुंबई स्थित फॉयनॅक गोल्ड रिअलकॉन प्रा.लि. या कंपनीने अनेक लोकांना फसविल्याबाबत**

**(९७) * ९८६९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे झालेल्या बहुचर्चित के.बी.सी. घोटाळयापाठोपाठ मुंबई स्थित फॉयनॅक गोल्ड रिअलकॉन प्रा.लि. या कंपनीनेही नाशिक शहरातील अनेक लोकांना लाखो रुपयांना फसविले असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किरकोळ गुंतवणूकीतून भुखंड देण्याचे अमिष दाखवून कंपनीच्या संचालकांनी लाखो रुपये घेऊन पोबारा केल्याप्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यांत आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक येथील भुखंड घोटाळयाप्रकरणी पोलिसांनी सविस्तर व सखोल तपास केला आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नाशिक येथे ठराविक अंतराने फसवणुकीचे प्रकार वारंवार घडत असल्याने यास आळा घालण्यासाठी कोणती खबरदारीची उपाययोजना करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

प्रकरणी पंचवटी पोलीस स्टेशन नाशिक येथे दिनांक २७/०१/२०१५ रोजी गु.र.नं.३८/२०१५ भा.दं.वि.कलम ४२०, ४०६, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(३) प्राप्त अर्जावरुन भुखंड घोटाळा प्रकरणी पोलीसाकडून तपास चालू असून गुन्ह्यात एकूण ६ आरोपी आहेत. एका आरोपीने न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला असून त्याची सुनावणी चालू आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.
(४) नाशिक शहर पोलीस आयुक्तालयात पोलीस स्टेशन निहाय कॉर्नर मिटींग, सोसायटी बैठक आयोजित करुन त्यामध्ये नागरीकांना जागरुक करण्यात आले आहे व येत आहे.

-----------------

## ठाणे जिल्हयातील एका (लेडीज) रेस्टॉरंट बारवर केलेल्या कारवाई संदर्भात

**(९८) * १०१६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील एका (लेडीज) रेस्टॉरंट बारवर केलेल्या कारवाईत जप्त केलेल्या डायरीच्या आधारे डायघर (जि.ठाणे) पोलीस स्टेशन मधील ५१ पोलीसांच्या बदल्या केल्याची बाब दिनांक २९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जप्त केलेल्या डायरी मध्ये बदली केलेल्या पोलिसांच्या नावाव्यतिरिक्त असलेल्या इतर बाबींची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, विना परवाना रेस्टॉरंटमध्ये लेडीज बार सुरु असल्याने प्रकरणाच्या चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.
(२) सदर वेळी पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात पोलीसांना डायरी मिळालेली नाही. तथापि छाप्याच्या वेळी मिळालेल्या कागदपत्रांमध्ये ज्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची नांवे आढळून आली आहेत, त्याबाबत चौकशी चालू आहे.
(३) सदर बाब विनापरवाना सुरू नाही. तथापि, महिला सेवकांच्या बिभत्स वर्तनामुळे याप्रकरणी पोलीसांनी भा.दं.सं. प्रमाणे कारवाई केली आहे.
(४) संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या चौकशीत पारदर्शकता यावी व नैसर्गिक न्यायाने चौकशी व्हावी याकरिता १३ पोलीस अधिकारी व ४७ पोलीस कर्मचारी यांच्या ठाणे मुख्यालय, ठाणे येथे तात्काळ बदल्या करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील सुवर्णकार व्यापारी कै.रवी टेहरे यांनी पोलिसांच्या त्रासामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(९९) * १०२०१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील सुवर्णकार व्यापारी कै.रवी टेहरे यांच्यावर खोटा आरोप करून त्यांस आत्महत्या करावयास भाग पाडणाऱ्या पाथरी येथील पोलीस कर्मचारी व इतरावर गुन्हे नोंदवून अटक करावी, तसेच त्या अनुषंगाने इतर मागण्याबाबत महाराष्ट्र राज्य सराफा सुवर्णकार फेडरेशनने पोलीस अधिक्षक, परभणी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या पोलीस व त्यांना आदेश देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर मृत्यूस कारणीभूत असल्याबाबतचा गुन्हा, अटक तसेच मयताच्या कुटुंबियास २५ लक्ष रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती सक्षम कारवाई करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, दोषी पोलीस, कर्मचारी, अधिकारी यांना पाठीशी घालण्याचा प्रकार वरिष्ठ स्तरावरुन करण्यात येत आहे काय, तसेच आर्थिक मदत देण्यात दिरंगाईचे धोरण राबविण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, शासन स्तरावरुन केलेल्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सुवर्णकार असोसिएशन व सराफा असोसिएशन यांनी परभणी जिल्ह्यातील पाथरी येथील सोनार रवि गणेशराव टेहरे याने पोलीस हेडकॉन्सटेबल टेकुळे व पोलीस उप निरीक्षक चिंचाणे यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत चौकशी करावी असा निवेदन दिले आहे.

(२), (३) व (४) प्रकरणी पोलीस स्टेशन पाथरी येथे गु.र.नं. ९९/१५ भा.दं.वि.कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्ह्यातील आरोपी पोलीस हवालदार व पोलीस उप निरीक्षक रेल्वे यांना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. आरोपी पोलीस हवालदार यांना निलंबित करून त्यांची खाते निहाय चौकशी चालु केली आहे. आरोपी पोलीस उपनिरीक्षक यांचेवर गुन्हा दाखल झाल्याची माहिती पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर यांना देण्यात आली आहे. आरोपींना पाठीसी घालण्यात आलेले नाही. सदरचा गुन्हा अधिक पुरावा गोळा करणेवर व हस्ताक्षर तज्ञाचा अभिप्राय येणेवर पोलीस तपासावर आहे.

-----------------

## मुंबईतील चेंबूरमधील गडकरी खाण परिसरातील रस्ते सिमेंटचे करण्याबाबत

**(१००) * ७१७५ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूरमधील गडकरी खाण परिसरात संपूर्ण पेव्हर ब्लॉक लावण्यात आले असल्यामुळे वर्षाभरात या रस्त्यांची दुरवस्था झाली असून रस्त्यांवरील या खडयांमुळे गेल्या काही दिवसांत परिसरात अनेक अपघात झाले असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी अवजड वाहनांची ये-जा लक्षात घेता येथील रस्ते सिमेंटचे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर रस्त्याखालून एच.पी.सी.एल व बी.पी.सी.एल या संस्थांच्या इंधन वाहिन्या (पेट्रोल, गॅस व इ.) जात असल्याकारणाने सदर वाहिन्यांच्या परिरक्षण व सुरक्षितता कारणास्तव सदर रस्त्याचे कॉक्रेटीकरण करु नये असे संबंधित संस्थांकडून महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे. या रस्त्याचे पुनर्बांधणी व मजबुतीकरणाचे काम सन २०१५-२०१६ वर्षाच्या महानगरपालिकेच्या नियोजित आराखड्यात अंतर्भूत करुन प्रस्तावितेले आहे.

-----------------

**मुंबईतील भाऊचा धक्का-मांडवा-सिडको येथील जलवाहतुकी संदर्भात**

**(१०१) * ९६३६ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भाऊचा धक्का-मांडवा-सिडको या त्रिकोणी परिघात जलवाहतुक सुरु करण्याची जबाबदारी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आणि मुंबई पोर्ट ट्रस्टकडे सोपविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाऊचा धक्का, मांडवा आणि नवी मुंबईत सिडको लगत तीन टर्मिनल उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जलमार्ग लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईच्या पुर्व किना-यावरील भाऊचा धक्का-मांडवा-नेरुळ या त्रिकोणी परिघात जलवाहतुक सुरू करण्यासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांना दिनांक ३०.०६.२०१५ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आळंदी (जि.पुणे) येथे येणा-या भाविकांना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत**

**(१०२) * ८००० श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वारक-यांचे श्रद्धास्थान असणा-या आळंदीत लाखो रुपये तीर्थक्षेत्र निधीतून खर्च करुन स्वच्छतागृहे अनेक ठिकाणी योजना अभावी बंद असणे, इंद्रायणी नदी घाटावर नैसर्गिक विधी उरकणे, शाळांची मैदाने खराब असणे, आळंदी पालिकेने स्वच्छतेचे काम करण्याचा ठराव मंजूर करुनही स्वच्छतेचे काम सुरू होत नसल्याचे माहे मे, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने जुलै महिन्यात आळंदीत यात्रा काळात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या भाविकांना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, आळंदी येथे नगर परिषद/केंद्र शासन/ राज्य शासन यांचा निधी तसेच पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत पुरुष व स्त्रिया यांचेसाठी शहरात विविध ठिकाणी स्नानगृहे/ शौचालये व मुताऱ्यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या शिवाय फायबर शौचालये व चार खणून तात्पुरत्या स्वरुपाची शौचालये विज व पाण्याच्या सुविधेसह आवश्कयतेनुसार उपलब्ध करुन दिली आहेत. तसेच या सर्व ठिकाणी आळंदी नगरपरिषदेमार्फत देखभाल व सफाईचे काम नियमितपणे केले जात आहे. इंद्रायणी नादीघाटावर नैसर्गिक विधी उरकणे अथवा शाळेची मैदाने खराब होण्याची बाब निदर्शनास आली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) शासनाने चौकशी केलेली नाही, तथापि, आळंदी नगरपरिषदेच्या मालकीची आणि तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत बांधलेली तसेच नगरपरिषदेने यात्रेसाठी विकत घेतलेली फिरती शौचालये यात्राकाळात मोफत उपलब्ध करुन दिली आहेत. तसेच शौचालयाच्या ठिकाणाची माहिती मिळावी यासाठी फलक लावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलुंड पूर्व (मुंबई) येथील मिठागरासाठी आरक्षित जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत

**(१०३) * १०३६५ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड पूर्वेकडील ४०० एकर जमिनीसह अन्य मिठागराच्या जमिनी प्रचलित रेडिरेकनर दराने खरेदी करुन तिथे झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिठागरांच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवता यावी यादृष्टीने विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (१०) मध्ये आवश्यक दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नाही. तथापि, केंद्र शासनाच्या मालकीच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे वर्ग करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दि. ३० डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली असून त्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील रस्त्यांवरील अपघात टाळण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(१०४) * ८६२० श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाहतूक कोंडी, रस्त्यांची स्थिती आणि बेदरकारपणे वाहतुकीचे नियम मोडून गाडी चालविणाऱ्या चालकांमुळे दिवसेंदिवस रस्ते अपघातात भर पडत आहेत या रस्ते अपघातात गेल्या वर्षभरात ४३४ चिमुरड्यांना रस्ते अपघातात जीव गमवावा लागल्याचे सेव्ह लाइफ फाउंडेशने माहितीच्या अधिकारातून माहिती माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते लहान मुलांसाठी धोकादायक होत असणे ही गंभीर बाब असून रस्त्यांवर होणार लहान मुलांचे अपघात टाळण्यासाठी विशेष संरक्षण देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यातील रस्ते अपघातात प्रतिवर्षी घट होत आहे. तसेच, सन २०१४ मध्ये ०-१४ या वयोगटातील ४३४ मुलांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असल्याची माहिती एप्रिल, २०१५ मध्ये माहिती अधिकारात देण्यात आलेली आहे.
(२) व (३) या अपघातातील बहुतांश मुले ही त्यांचे पालक/नातेवाईक यांच्यासह प्रवास करताना मयत झालेली आहेत.

मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेतील शिक्षण विभागामार्फत कायमस्वरुपी व फिरते वाहतूक पार्कच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना वाहतूकीचे नियम, रस्ता सुरक्षिततेचे ज्ञान, रस्त्यावर पादचाऱ्यांनी पाळावयाचे नियम व काळजी यांचे प्रात्यक्षिकासह शिक्षण दिले जाते. तसेच, राज्यात दरवर्षी होणाऱ्या रस्ता सुरक्षा अभियानामध्ये शालेय विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले जाते. याशिवाय महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता ९ वी च्या क्रमिक पाठयपुस्तकांमध्ये रस्ते सुरक्षितता व इतर उपयुक्त सामाजिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

-----------------

## औरंगाबाद शहराला होत असलेल्या दुषित पाणी पुरवठयाबाबत

**(१०५) * ६९५९ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराला जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा करण्यात येत असून पाणी शुध्दीकरणाचे केंद्र फारोळा येथे आहे. या शुध्दीकरण केंद्रातुन येणाऱ्या जलवाहिन्या शहरातील पाण्याच्या टाक्यापर्यंत येईपर्यंत अनेक ठिकाणी गळतात तसेच त्या जलवाहिनीत दुषित पाणी जाऊन अनेक भागांमध्ये दुषित पाणीपुरवठा होत असल्याचे माहे, मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, येथील स्मशानभुमींच्या विकासासाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी अखर्चित ठेवण्याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्याचे होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(i) औरंगाबाद शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहीन्या जुन्या झाल्यामुळे पाण्याच्या दाबाचे त्यातून कधी कधी गळती होते. या जलवाहीन्यांची औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे तातडीने दुरुस्ती करण्यात येते.

(ii) या मुख्य जलवाहिन्यांद्वारे शहराला दुषित पाणीपुरवठा होतो हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) (i) शासनाने महानगरपालिका क्षेत्रात "प्राथमिक सोयी-सुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदान" या योजनेअंतर्गत दि.३ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये औरंगाबाद महानगरपालिकेसाठी स्मशानभूमी विकासाकरिता रु. २२.२७ लक्ष एवढा निधी वितरीत केला होता, मात्र सदर शासन निर्णया अन्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने कामांमध्ये बदल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आले होते.

(ii) विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने सदर अधिकारांचा वापर करुन अन्य कामे हाती घेऊन सर्व निधी खर्च केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मुंबई महानगरपालीकेच्या पुर्वपरवानगीशिवाय रिलायन्स जियो या कंपनीने रस्ते खोद्ल्याबाबत**

**(१०६) * ९९५१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगीशिवाय अंधेरी पुर्वेकडील नव्याने बनवण्यात आलेले मरोळ मिलटरी रोड, मकवाना रोड व हिंन्दू फ्रेंडस सोसायटी हे रस्ते रिलायन्स जियो या कंपनीने खोदल्यामुळे पालिकेने सदरील कंपनीस १८ कोटी रुपयांचा दंड थोटावला असुन दंड न भरल्यास त्यांच्या अनामत रक्कमेतून हा दंड वसुल करण्यात येईल असे के-पूर्व विभागाचे आयुक्त यांनी सांगितल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने सदरील दंड वसुल करण्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागतील मकवाना रोड, हिंदू फ्रेडस सोसायटी रोड व मिलीटरी रोड या ठिकाणी रिलायन्स जिओ या कंपनीने विना परवाना खोदकाम केल्याबाबत रिलायन्स जिओ कंपनीस १७.८९ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे.
(२) दंडाची रक्कम रिलायन्स जिओ या कंपनीच्या अनामत रक्कमेतून वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ग्रँट रोड (मुंबई) येथील ब्राम्हणवाडीतील ९ चाळींच्या पुनर्विकसामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबत**

**(१०७) * ८२२५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ग्रँट रोड येथील शीतल इस्टेट ब्राम्हणवाडीतील ९ चाळीच्या पुनर्विकासाला दिनांक २८ जुन, २०१२ रोजी वा त्यासुमारास क्र.R/NOC/F १७०/३४५९ MBRRB १२ चे ना-हरकत प्रमाणपत्र देणा-या मुंबई इमारत दुरूस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या अभियंता आणि अधिकारी यांची उघड चौकशी करण्याची लाचलुचपत प्रतिबंधक

विभागाने माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान मागितलेली परवानगी त्वरित द्यावी यासाठी दिनांक २ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत उघड चौकशीच्या मागणीबाबतचे लोकप्रतिनिधीचे पत्र अतिरिक्त मुख्य सचिव, गृहविभाग यांच्याकडे कार्यवाहीसाठी पाठविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त मुख्य सचिव, गृहविभाग यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला उघड चौकशीची परवानगी दिली काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) ग्रँडरोड येथील शितल इस्टेटच्या ११ चाळींच्या पुनर्विकासाकरिता घरमालक/विकासक यांना नियम डावलून ‘ना-हरकत प्रमाणपत्र’ देताना झालेल्या गैरप्रकाराबाबत संबंधितांची उघड चौकशी करणेसंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**म्हाडा अभिन्यासामधील वर्तकनगर (ठाणे) येथील रस्ते विकसित करण्यासाठी लागलेला खर्चाची मागणी महानगरपालिका म्हाडाकडे करित असल्याबाबत**

**(१०८) * ७५६४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील वर्तकनगरमध्ये म्हाडाच्या मालकीच्या जागेवर ठाणे महापालिकेने युटीडब्लूटी अंतर्गत रस्ते कॉंक्रीटकरणाचे कामांवर सुमारे १० कोटी २७ लक्ष रुपये इतका खर्च केला असल्याचे दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडा अभिन्यासामधील वर्तकनगर (ठाणे) येथील रस्ते विकसित करण्यासाठी सन २०१३ मध्ये ठाणे महापालिकेला ना हरकत पत्र देताना ‘ठाणे मनपाने सर्व खर्च करावा व भविष्यात खर्चाची मागणी म्हाडाकडे करुन नये’ अशी अट घालण्यात आल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असताना तत्कालिन महापालिका आयुक्त यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये, महापालिकेने केलेल्या कामावरील खर्चाच्या रकमेची मागणी म्हाडाकडे केली असल्याचेही त्याचवेळी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत म्हाडाकडून ठाणे महानगरपालिकेस काय कळविण्यात आले आहे व केव्हा,

(५) तसेच, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात येऊन संबंधित अधिका-यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत संबंधित काही राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिका-यांकडून लेखी निवेदन माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नगरअभियंता, ठाणे मनपा तसेच प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

वर्तक नगर म्हाडा अभिन्यास अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेने एकूण रुपये १०,४१,७९,०००/- इतक्या रकमेस प्रशासकीय वित्तीय मंजुरी दिली आहे व आतापर्यंत रुपये ९,२५,७७,३८४/- इतका खर्च झालेला आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) म्हाडाने ठाणे महानगरपालिकेस सदर रकमेची प्रतिपुर्ती करण्याचे मान्य केले आहे. सदर प्रतिपुर्ती Pro-Rata पद्धतीने वैयक्तीक पुनर्बांधणी प्रस्तावांतर्गत संबंधित अर्जदार संस्थेकडून परस्पर वसूल करावा याबाबत म्हाडा यांनी ठाणे महानगरपालिकेकडे स्वतंत्र ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे मान्य केले आहे.

(५) व (६) ठाणे महानगरपालिकेकडे दिनांक ०७.०५.२०१५ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. परंतु शासनाकडे तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नाही.

स्थानिक नागरीकांचे सुविधेकरीता ठाणे महानगरपालिकेने विहित प्रक्रिया अवलंबुन म्हाडा अभिन्यास अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्याकरिता निर्णय घेतला आहे.

म्हाडा अभिन्यासाने खर्च झालेल्या रकमेची प्रतिपुर्ती करण्याचे मान्य केले आहे. यास्तव, चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिके अंतर्गत शाळेतील विद्‍यार्थ्यांना इयत्ता सातवी नंतर बेकायदेशीररित्या शाळा सोडल्याचा दाखला देत असल्याबाबत

**(१०९) * ८४२९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आतापर्यंत केवळ चौथी किंवा सातवीपर्यंतचे शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये (सक्तीच्या व मोफत शिक्षण कायद्या नुसार) इयत्ता आठवीपर्यंतचे वर्ग सुरु करण्याऐवजी मुंबई महानगरपालिकेने या विद्यार्थ्यांना बेकायदेशीररित्या शाळा सोडल्याचा दाखला देत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बृहन्मुंबई महापालिका शिक्षक सभेने यावर आक्षेप नोंदिवला असून आपल्या सर्वच्या सर्व ११०० शाळांमध्ये आठवीपर्यंतच्या शिक्षणतज्ञाची सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दयावी अशी मागणी केली आहे. त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ११०० प्राथमिक शाळा नसून ९२३ उच्च प्राथमिक शाळा आहेत.

सदर शाळांपैकी सन २०१४-१५ या वर्षी १०० शाळांमध्ये व सन २०१५-२०१६ या वर्षी २१० शाळांमध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात आली आहे.

उर्वरित शाळांमध्ये पुढील तीन वर्षात टप्प्याटप्प्याने इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील एका महिलेवर सामाजिक बहिष्कार टाकला असल्याबाबत

**(११०) * ८८८२ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील कामथे बोरघर फौजदार वाडीतील श्रीमती लक्ष्मी अर्जुन गोगावले या महिलेवर दिनांक १५ सप्टेंबर, २०१३ पासून गावातील तसेच भावकीतील लोकांनी सामाजिक बहिष्कार टाकला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सामाजिक बहिष्काराबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली असून पोलादपूर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.०७/२०१५ भा.दं.वि.सं.कलम ३८५, १२०(ब), १५३(ब) (१) (क) प्रमाणे ११ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुंडलवाडी (जि.नांदेड) येथील बाजारपेठेत महिला व पुरुषांसाठी सुलभ शौचालय नसल्याबाबत**

**(१११) * ८९४९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात कुंडलवाडी हे एक मोठे शहर असून तेथे आठवड्यातून दोन दिवस बाजार भरतो त्यावेळी बाजारपेठेत येणाऱ्या महिला व पुरुषांसाठी सुलभ शौचालय नसल्याने येथील रहिवाशांनी नगरपालिकेकडे वारंवार शौचालय बांधण्याबाबतचे निवेदन देऊनही याकडे नगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील बाजारपेठेत स्त्री/पुरुषांसाठी सुलभ शौचालय उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बाजारपेठेत शौचालय नाही ही बाब खरी आहे. तथापि, सुलभ शौचालय उभारण्याकरिता नगरपालिकेकडून कार्यवाही प्रस्तावित आहे.

(२) व (३) सदर बाजारपेठेतील आरक्षण क्र. (१०) मध्ये चिकन, मटन व फिश मार्केटच्या बांधकामास प्रशासकिय मान्यता देण्यात आली असुन त्यामध्ये महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये बांधकाम करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

-----------------

**नागपूर येथील दिक्षाभूमिला “अ” वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याच्या मागणीबाबत**

**(११२) * ९३४८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७९ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षाभूमिला "अ" वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नागपूरच्या दिक्षाभूमीला "अ" किंवा "ब" वर्ग तिर्थस्थळ / पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याची मागणी प्राप्त झालेली आहे. त्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून माहिती मागविण्यात आली होती. ती प्राप्त झाली असून मागणी विचाराधीन आहे.

-----------------

**सातपाटी (जि.पालघर) गावातील धूपप्रतिबंधक संरक्षण बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत**

**(११३) * १०७९९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातपाटी (जि.पालघर) गावातील धूपप्रतिबंधक संरक्षण बंधाऱ्याच्या दुरुस्तीकडे महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे समुद्रांच्या लाटांमुळे बंधाऱ्यालगत राहणाऱ्या घरांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातपाटी मच्छीमार बांधवांनी बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत शासनाकडे वारंवार निवेदने सादर करुनही याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी वा पाहाणी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) सदर कामांस महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत राज्यस्तरीय धूप प्रतिबंधक बंधारे योजने अंतर्गत प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

शासन निर्णय गृह विभाग क्र.एमआयएस ०२१५/प्र.क्र.६४/बंदरे-२, दिनांक २१.०५.२०१५ नुसार पुढील कार्यवाही किनारी अभियंता व पत्तन अभियंता, कोकण भवन यांचेकडून करण्यात येईल.

-----------------

## कोपरअल्ली माल (ता.मुलचेरा, जि.गडचिरोली) येथे गुप्त धनासाठी एका मुलाचा नरबळी दिल्याची घटना

**(११४) * ९८०४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरअल्ली माल (ता.मुलचेरा, जि.गडचिरोली) येथील श्री.भिष्णू सांबय्या कोंतमवार वय ११ वर्षे याचा अपहरण करुन गुप्त धनासाठी नरबळी दिल्याची घटना दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार संबंधित मुलाच्या वडीलांनी पोलीस अधिक्षक गडचिरोली यांच्याकडे दिनांक २८ सप्टेंबर २०१२ रोजी वा त्यासुमारास करुनही अद्यापही आरोपीला अटक झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी शासनाने केली काय व त्यानुसार संबधीत संशयीत गुन्हेगारावर शासन कारवाई करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) होय.

(३) भिक्कु कोंतमवार, या ११ वर्षे वयाच्या मुलाचा नरबळी देऊन खुन करण्यात आल्याबाबत मुलाच्या वडिलांनी अर्ज दिला होता. त्यानुषंगाने शासनाने सदर प्रकरण गुन्हे अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित केले होते. परंतु गुन्हे अन्वेषण विभागाने केलेल्या तपासात मुलाचा मृत्यू घातपाताने अथवा नरबळीच्या प्रकारात झाल्याचे निष्पन्न झाले नाही. मुलाचा मृत्यू पाण्यात बुडल्याने श्वास गुदमरुन झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.